follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

'दगडूशेठ' गणपती मंदिरात 'शारदेश मंगलम्' विवाह सोहळा वृत्त पान ३ वर...

RNI Regd. No. 72105/99 ❊ वर्ष २५ ❊ अंक २४२ ❊ सातारा ❊ शनिवार, दि. ११ मे २०२४ ❊ पाने ८ (सुप्रभात) ❊ किंमत ५/- रूपये

डॉ. दाभोळकर हत्या : दोघांना जन्मठेप

तीन आरोपी पुराव्याअभावी निर्दोष

पुणे : प्रतिनिधी

विवेकवादी विचारवंत आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रणेते डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्या प्रकरणी तब्बल ११ वर्षानंतर न्यायालयाने आपला निकाल दिला आहे. या प्रकरणी दोन आरोपीना सश्रम जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली असून तिघांची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

डॉ. दाभोळकर हत्या प्रकरणात आरोपी असलेल्या वीरेंद्र तावडे, सचिन अंदूरे, शरद कळसकर, वकील संजीव पुनाळकर आणि त्यांचा सहाय्यक विक्रम भावे यांच्यापैकी कळसकर आणि अंदुरे यांच्यावरील आरोप सिद्ध झाले असून बाकीच्या आरोपीची पुराव्याअभावी मुक्तता करण्यात आली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाचे विशेष न्यायाधीश पी.पी. जाधव यांनी हा निकाल दिला.

डॉ. दाभोळकर नेहमीप्रमाणे २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी फिरायला गेले असताना मोटारसायकलवरुन आलेल्या दोघांनी बालगंधर्व पुलावर ॐकारेश्वर मंदिरानजीक त्यांची गोळ्या झाडून हत्या केली.

शरद कळसकार आणि सचिन अंदुरे अशी मारेकऱ्यांची नावं असल्याचं न्यायालयात सिद्ध झाले आहे.

मावळातील तळेगावात चोरट्यांकडून भरदिवसा गोळीबार

वडगाव मावळ/ प्रतिनिधी

चोरीच्या उद्देशाने आलेल्या चोरट्यांनी भरदिवसा गोळीबार केल्याची घटना गुरुवारी (दि.९) दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास मस्करनेस कॉलनी तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे येथे घडली.या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तळेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, तळेगाव दाभाडे मधील मस्करनेस कॉलनी या ठिकाणी काही चोरटे घरफोडी करण्याच्या उद्देशाने आले होते. ते घरफोडी करू शकले (पान ५ वर)

पाच वर्ष अभिनय क्षेत्रापासून दूर राहणार

शिरूर मतदारसंघावर लक्ष केंद्रित करण्यासाठी अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांचा मोठा निर्णय

पुणे : प्रतिनिधी

पुढील पाच वर्ष अभिनय क्षेत्रापासून दूर राहून मतदारसंघातील प्रश्न सोडवण्यावर आपला भर राहील, अशी ग्वाही शिरूर लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली आहे. मात्र, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचा विचार आणि इतिहास लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांच्या भूमिका हा या निर्णयाला अपवाद असेल, असेही डॉ कोल्हे म्हणाले.

शिरूर लोकसभा मतदारसंघातून पुन्हा निवडून आलो तर पाच वर्ष रुपेरी पडद्यावर दिसणार नाही. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे प्रश्न सोडवणे यालाच आपले प्राधान्य राहील. या काळात पूर्णवेळ राजकारणच करू.

शिरूरच्या मतदारांना आपला हा शब्द आहे, असे डॉ कोल्हे यांनी सांगितले.

शिरूर लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील आणि डॉ कोल्हे यांच्यात सरळ लढत होत आहे. आढळराव पाटील यांचा निवडून आणण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कंबर कसली आहे. त्यामुळे ही लढत बारामती प्रमाणेच शरद पवार विरुद्ध अजित पवार अशीच असल्याचे मानले जात आहे.

डॉ कोल्हे यांच्या अभिनय क्षेत्रातील कारकिर्दीवरून अजित पवार आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांनी अनेकदा त्यांची खिल्ली उडवली आहे. मतदारसंघातील प्रचार मोहिमेच्या पहिल्याच टप्प्यात अजित पवार यांनी मतदारांना काम करणारा खासदार पाहिजे की अभिनय करणारा, असा सवाल केला होता. मागील कार्यकाळात डॉ कोल्हे यांचा मतदारसंघ अजिबात जनसंपर्क नसल्याची टीकाही वारंवार करण्यात आली विरोधकांच्या या टीकेला सडेतोड प्रत्युत्तर देण्यासाठीच डॉ कोल्हे यांनी अभिनय क्षेत्रापासून दूर राहून पूर्णवेळ राजकारण करण्याची घोषणा केली आहे.

जातीपातीच्या राजकारणाला बळी न पडता विकासाची कास धरा...

मनसेप्रमुख राज ठाकरे यांचे मतदारांना आवाहन

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : सध्याच्या काळात नियोजनबद्ध विकासाऐवजी जातीपातीच्या विकारी राजकारणाला खतपाणी घालून स्वतःच्या राजकीय तुंबड्या भरण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. मात्र, मतदारांनी आणि जबाबदार लोकप्रतिनिधींनीही जातीपातीच्या राजकारणाला बळी न पडता विकासाची कास धरावी, असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी केले.

पुणे लोकसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेत राज ठाकरे बोलत होते. या सभेला ज्येष्ठ मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह महायुतीतील सहभागी पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

नियोजनाच्या अभावामुळे अनेक शहरे उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. शहरांचे नियोजन योग्य पद्धतीने करणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. मात्र, सध्याच्या काळात नियोजनबद्ध विकासाऐवजी जातीपातीच्या राजकारणासारखे घातक मुद्दे पुढे करून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. अशा अपप्रचाराला बळी न पडता मतदारांनीच विकासाच्या नियोजनाबाबत आपल्या लोकप्रतिनिधींना जाब विचारला पाहिजे, असे ठाकरे यांनी यावेळी सांगितले.

'मी ही असा फतवा काढतो की...'

सन १९७०-८० च्या दशकात तत्कालीन सत्ताधाऱ्यांना उन्माद आला होता. मात्र, त्याच्या पुढील दहा वर्षात त्यांना डोके वर काढण्यास संधी मिळाली नाही. त्यामुळे आता मुस्लिम मोहल्ले आणि मशिदीमधून फतवे काढले जात आहेत. काँग्रेसला मते देण्यास या फुतव्यांमधून सांगितले जात आहे. मात्र, मुस्लिम समाज असे फतवे काढणाऱ्या मुल्ला मौलवींच्या घरातील गुरेढोरे नाही. आपल्याला कोण आणि कसे वापरून घेते, याची त्यांनाही जाणीव होत आहे. तिकडून असे फतवे निघत असतील तर मी देखील आज फतवा काढतो की, माझ्या तमाम हिंदू बांधवांनी भारतीय जनता पक्षाच्या, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना भरघोस मतदान करा. तुमचेही 'मोहोळ' उठू द्या.

शरद पवारांबरोबर राहूनही अजित पवारांनी...

राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कौतुक केले. अजित पवार यांच्या कार्यशैली बद्दल काही मतभेद असतीलही. मात्र, इतकी वर्ष शरद पवार यांच्याबरोबर राहूनही त्यांनी आजपर्यंत कधी (पान ५ वर)

पुणे लोकसभा मतदारसंघात १४ लाख मतदार ओळख चिठ्ठ्यांचे वितरण

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी होणाऱ्या पुणे लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची तयारी अंतीम टप्प्यात आहे. पुणे लोकसभा मतदार संघातील वडगाव शेरी, शिवाजीनगर, कोथरुड, पर्वती, पुणे कॅन्टोंमेंट व कसबा पेठ विधानसभा मतदार संघामध्ये २ हजार २१० मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन १४ लाख ३ हजार ४६२ मतदार ओळख चिठ्ठ्यांचे वितरण करण्यात आले आहे.

पुणे लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २ हजार १८ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. पुणे लोकसभा मतदार संघात २० लाख ६१ हजार २७६ मतदार असून त्यापैकी वडगाव शेरी मतदार संघात सर्वाधिक ४ लाख ६७ हजार ६६९ मतदार आहेत. वडगाव शेरी मतदार संघातील ३ लाख ६४ हजार ९४६ मतदार ओळख चिठ्ठ्यांचे ४५३ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून घरोघरी जाऊन ७८ टक्के वितरण करण्यात आले आहे.

शिवाजीनगर विधानसभा मतदार संघात १ लाख ७२ हजार ५४४, कोथरुड विधानसभा मतदार संघात २ लाख ६८ हजार ३४७, पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघात १ लाख ८८ हजार २७०, पर्वती विधानसभा मतदार संघात १ लाख ८३ हजार ६७७ तर कसबा पेठ विधानसभा मतदार संघात २ लाख २५ हजार ६७८ मतदार ओळख चिठ्ठ्यांचे वितरण करण्यात आले.

मतदान केंद्रावर मतदारांसाठी आवश्यक किमान सुविधा करण्यात आल्या असून मतदारांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होऊन मतदान करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पुणे लोकसभा मतदार संघातील आदर्श व महिला संचलित मतदान केंद्र

पुणे लोकसभा मतदार संघाअंतर्गत वडगावशेरी मतदार संघात कै. तुकाराम धोंडीराम पठारे प्राथमिक विद्यालय, शारदाबाई पवार इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये, आय टी पार्क, खराडी खोली क्रमांक १, शिवाजीनगर मतदार संघात आय टी आय, औंध, कोथरुड मतदार संघात सीएम इंटरनॅशनल स्कूल एस के पी कॅम्पस, बाणेर, बालेवाडी खोली क्रमांक १०, पर्वती मतदार संघात प्रगती विद्यालय हिंगणे खुर्द, पुणे कॅन्टोन्मेंट मतदार संघात अल्पबचत भवन क्वीन्स गार्डन पुणे, कसबा पेठ मतदार संघात टिळक आयुर्वेदिक विद्यालय, रास्ता पेठ पश्चिमेकडील इमारत, तळमजला खोली क्रमांक ३ याठिकाणी आदर्श मतदान केंद्र असणार आहेत.

वडगावशेरी मतदार संघातील मतदान केंद्र क्रमांक ३४९ सेंट अर्नाल्ड सेंट्रल स्कूल, वडगावशेरी, तळमजला खोली क्र.१, शिवाजीनगर मतदार संघातील मतदान केंद्र क्रमांक १९१ विद्याभवन ज्युनिअर कॉलेज, मॉडेल कॉलनी, खोली क्र.१, कोथरूड मतदार संघातील मतदान केंद्र क्रमांक ३५८ कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग फॉर वुमन, (पान ५ वर)

घरी बसून राहणाऱ्यांना कोणी मतं देतं का?

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विरोधकांना टोला

मुंबई : प्रतिनिधी

घरी बसून राहणाऱ्यांना कोणी मतं देतं का? काम करणाऱ्यालाच लोक मतदान करतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी दिवसातील २०-२० तास सर्व काम करीत आहेत. त्यांच्या मनात देशहिताशिवाय वेगळा विचार नाही. त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी दमदार कामगिरी करेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

मागील १० वर्षात देशाची आणि २ वर्षात राज्याची प्रगती होत आहे. सन २०१४ पूर्वी अनेक बॉम्बस्फोट झाले. आर्थिक घोटाळे झाले. मागील दहा वर्षात कोठेही बॉम्बस्फोट झाले नाहीत. घोटाळे झाले नाहीत. सत्ताधाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले नाहीत, असा दावा शिंदे यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना केला.

महायुती राज्यात जास्तीत जास्त जागा मिळवेल.

मोदी यांच्या ४०० पार या स्वप्नाची पूर्तता करण्यात मोठी भूमिका बजावेल. तीन टप्प्यातील मतदानानंतर महायुती आघाडीवर आहे. राज्यातील पाचही टप्प्यात महायुती आघाडी कायम ठेवेल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

भाजप व प्रशासनने क्रीडा क्षेत्राकडे दुर्लक्ष केले

खेळाडूंच्या मेळाव्यात शरद पवार यांची टीका

पुणे : प्रतिनिधी

अलीकडच्या काळात भाजप व प्रशासनने क्रीडा क्षेत्राकडे दुर्लक्ष केले आहे. क्रीडा क्षेत्रातील विविध प्रकारच्या खेळाडूंना सोयीसुविधा नसल्याने त्यांचे कष्ट वाया जात आहे. त्यामळे महाराष्ट्र मागे येत आहे. क्रीडा क्षेत्राला सोयीसुविधा देण्यासाठी तसेच अधिक प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही सातत्याने पर्यंत केले आहेत. यापुढील काळातदेखील खेळाडूंचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही काम करणार आहोत. त्यांना न्याय देणे आमचे प्राधान्य असणार आहे,असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी खेळाडूंना बोलतांना व्यक्त केला.

महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी 'थेट सवांद खेळाडूंशी'कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. इंडिया आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर,माजी क्रीडा मंत्री सुनील केदार,माजी खासदार ऍड वंदना चव्हाण,महाराष्ट्र कुस्ती परिषदेचे सचिव बाळासाहेब लांडगे,काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे,राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप,आपचे शहराध्यक्ष सुदर्शन जगदाळे,अंकुश काकडे,

काँग्रेसचे जेष्ठ नेते अभय छाजेड,माजी नगरसेवक अविनाश बागवे,महाराष्ट्र कुस्ती परिषदेचे सचिव बाळासाहेब लांडगे,अर्जुन पुरस्कार विजेत्या शकुंतला खटावकर,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या स्मिता गोरे यांच्यासह अर्जुन पुरस्कार विजेते,छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार विजेते,कुस्तीगीर,आजी माजी क्रीडा संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

पवार म्हणाले,राज्यात खेळाडूंना सोयीसुविधा देण्यासाठी आम्ही सातत्याने काम करीत आहे. मात्र भाजपाच्या काळात राज्यातील खेळाडूंना संपवण्याचा घाट सुरू आहे,असे खेळाडूंच्या तक्रारींतून दिसून येत आहे. त्यांना न्याय देण्यासाठी एकत्र येऊन काम करावे लागणार आहे.

७०वर्षावरील व्यक्तींनी खेळाच्या संदर्भात काम करायचे नाही, (पान ५ वर)

शरद पवार यांनी नाकारली सोबत येण्याची 'ऑफर'

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे संसदीय लोकशाही संकटात आली आहे, असा आरोप करून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी पंतप्रधान मोदी यांनी भर सभेत पवार यांना आपल्या सोबत येण्याची दिलेली ऑफर नाकारली आहे.

नंदुरबार येथील सभेत बोलताना मोदी यांनी, पवार आपल्या सोबत आले तर त्यांची सर्व स्वप्न साकार होतील, असा खुला प्रस्ताव दिला होता. मात्र, लोकशाही पद्धतीवर विश्वास नसलेल्या कोणाही बरोबर आपण जाणे शक्य नाही, असे सांगत पवार यांनी पत्रकारांशी बोलताना हा प्रस्ताव नाकारला.

दिल्ली आणि झारखंडच्या मुख्यमंत्र्यांना अटक करण्यात आली. केंद्र सरकारचा हात असल्याशिवाय अशा पद्धतीची कारवाई शक्य नाही. मोदी आणि त्यांच्या पक्षाचा लोकशाहीवर विश्वास नाही. व्यक्तिगत संबंध कसेही असले तरी ज्यांचा लोकशाहीवर विश्वास नाही त्यांच्याबरोबर राजकीय दृष्ट्या आपण कधीही जाणार नाही, असे पवार यांनी सांगितले. (पान ५ वर)

मनी लॉंड्रिंगची भीती दाखवत ८२ लाखांचा ऑनलाईन गंडा

पुणे : तुमच्या मोबाईलचा वापर करून मनीलोंड्रिगद्वारे काळा पैशाबाबत आर्थिक व्यवहार होत असून कारवाईची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी एकाची ८२ लाख २८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याबाबत एकाने येरवडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारदाराच्या मोबाइल क्रमांकावर चोरट्यांनी संपर्क साधला होता. काळा पैसा व्यवहारात कारवाई करण्यात येणार असल्याची बतावणी सायबर चोरट्यांनी तक्रारदाराकडे केली होती. मुंबई पोलीस दलातील उपनिरीक्षक संदीप राव बोलत असून, याप्रकरणी गोवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची बतावणी चोरट्याने केली होती. त्यानंतर चोरट्यांनी तक्रारदाराला बनावट अटक (पान ५ वर)

शिवरे येथे डंपर अंगावरून गेल्याने महिला जागीच ठार

भोर/प्रतिनिधी

पुणे - सातारा महामार्गावर भरधाव वेगाने जाणाऱ्या डंपर ने पाठीमागून दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीवर पाठीमागे बसलेली महिला रस्त्यावर पडली. यादरम्यान डंपर या महिलेच्या अंगावरून गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकी स्वार तिचा पती गंभीर जखमी झाला आहे. ही दुर्दैवी घटना पुणे-सातारा महामार्गावरील शिवरे (ता. भोर) येथे गुरुवारी (दि.९)सकाळी सव्वा नऊ वाजण्या च्या दरम्यान घडली.

सोनाली महेश साठे (वय २३, रा. सांगली) असे डंपर खाली चिरडून मृत्यू पावलेल्या महिलेचे नाव आहे. तसेच तिचा पती महेश बाळू साठे (रा. सांगली) हे या अपघातात गंभीर जखमी झाला आहे. त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे.

मिळालेल्या (पान ५ वर)

राजेवाडी येथे चारचाकी वाहनावर वडाचे झाड कोसळले

- महिन्यातील तिसरी घटना
- निसर्ग प्रेमींकडून तीव्र संताप

भोर/प्रतिनिधी

भोर ते शिरवळ रस्त्यावर राजेवाडी (ता. खंडाळा) हद्दीत चारचाकी गाडी मारुती ओमिनी (एम.एच.१४, ए.एम.३३७४) शिरवळ दिशेने जात असताना राजेवाडी (ता.खंडाळा) गावच्या हद्दीत गुरुवार (दि.९) रोजी

वाहनावर अर्धवट अवस्थेत जळालेले झाड अचानक कोसळल्याने चारचाकी वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

रस्त्याच्या शेजारील वडाच्या झाडाचा बुंधा जळाल्याने अचानक झाड कोसळून ओमिनीच्या पाठीमागील बाजूवर कोसळले. यावेळी वाहनचालक व इतर एक व्यक्ती वाहनाच्या पुढील बाजूस असल्याने सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मात्र ओमिनी वाहनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

या रस्त्यावर मोठ मोठी झाडे कोसळण्याची या महिन्यातील तिसरी घटना आहे. उन्हाळ्यामध्ये शेतकरी वर्ग रस्त्याच्या शेजारील शेतातील स्वच्छता करताना शेतातील (पान ५ वर)

संपादकीय

पूर्ण स्वातंत्र्य

नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण चर्चेत आल्यापासून एक विषय सारखा चर्चेत असतो; आपले शाळा-कॉलेजातील अभ्यासक्रम कालबाह्य झाले आहेत.नोकरीदेणारे उद्योजक तक्रार करतात की, आजचे पदवीधर आजच्या गरजांसाठी उपयुक्त नाहीत, कारण त्यांना नीट प्रशिक्षणमिळत नाही. आजकाल कॉलेज, विद्यापीठाचा दर्जा ठरवताना गुणवत्तेचा एक निकष किती विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाली हा असतो.यानिमित्ताने एक प्रश्न मांडावासा वाटतो : वेगाने बदलणाऱ्या विज्ञान, तंत्रज्ञानामुळे उद्योग क्षेत्र, सेवा क्षेत्र, कामाचे म्हणजेनोकरीचेस्वरूप आरपार बदलले आहे. सातत्याने बदलते आहे. त्या वेगाने सारखे अभ्यासक्रम बदलणे, परीक्षेचे स्वरूप बदलणे शक्य तरी आहे का? उद्योग क्षेत्राचा विस्तार, त्यातील वैविध्य लक्षात घेता अभ्यासक्रम नेमका कोणत्या उद्योगाला पूरक ठरवायचा?

दुसरे असे की कोणती नोकरी स्वीकारायची, याचे पूर्ण स्वातंत्र्य विद्यार्थ्याला आहे. ते कॉलेज, विद्यापीठ ठरवत नाही. हल्ली असे लक्षात येते की, ९० टक्के विद्यार्थी त्यांना जे शिकवले गेले, त्याचा पुढील आयुष्यात मुळीच प्रत्यक्ष उपयोग करत नाहीत. आयआयटीतून केमिकल इंजिनिअरिंग केलेला विद्यार्थी संगणक क्षेत्रात काम करतो. मोठ्या कंपन्या उभारतो. अन् शेवटी हे सारे सोडून मराठीत मोठमोठे सुलभ ग्रंथ लिहितो!

चेतन भगत मेकॅनिकल इंजिनिअर पण काम परदेशी बँकेत... नंतर चक्क कादंबरी, चित्रपट लेखन. आयआयटीचे काही विद्यार्थी तर चक्क आध्यात्मिक गुरू, संत झाले आहेत. अशी अनेक उदाहरणे देता येतील. कॉलेज सोडताच नोकरीत, व्यवहारात आपण जे काही ज्ञान, विज्ञान वापरतो ते सारे अभ्यासक्रमाबाहेरचे असते. मग उद्योगाच्या गरजा ओळखून अभ्यासक्रम तयार करा हा आग्रह कशासाठी?कोणत्याही विषयाचा अभ्यासक्रम सर्वंकष असावा लागतो. मूलभूत संकल्पना, त्याचे प्लिकेशन, समस्यांचे आकलन, विश्लेषण, मिळून काम करण्याचे धोरण, नैतिक मूल्यांचे महत्त्व, स्वतंत्र तार्किक विचार करण्याची पद्धत, क्षमता हे सारे शिकवायचे असते.

प्रत्येक प्रश्नाचे एकच ठोकळेबाज उत्तर या भ्रमातून बाहेर पडून, एकापेक्षा जास्त उत्तरांची संभाव्यता तपासायची असते. त्या अनेक उत्तरांतून सर्व दृष्टीने उत्तम, कमी खर्चिक, सोपे उत्तर कोणते हा शोध व्यवहारात जास्त महत्त्वाचा असतो. अभ्यासक्रम तयार करताना काय, किती, कसे, केव्हा शिकवायचे अन् शिकवले त्याचे उचित, योग्य मूल्यमापन कसे करायचे, यावर जास्त विचार व्हायला हवा. पूर्वी पाढे पाठ असण्याला महत्त्व होते. आता त्याची गरज नाही. समीकरणे सोडवायला संगणक आहेत. हव्या त्या माहितीसाठी इंटरनेट आहे. आता फळ्यावर प्रमेये सिद्ध करून दाखविण्याची गरज नाही. जे पुस्तकात आहे तेच कशाला शिकवायचे? त्याऐवजी त्या प्रमेयामागची संकल्पना, त्याचा व्यवहारात उपयोग सोदाहरण समजावून सांगा. ते जास्त फायद्याचे.अभ्यासक्रम हा केवळ गाइडलाइन म्हणून वापरायचा असतो शिक्षकाने. तो अभ्यासक्रम किती रंजक, उपयोजित पद्धतीने शिकवायचा याचे पूर्ण स्वातंत्र्य शिक्षकाला असते. आपण ते वापरत नाही. आपले शिकवणे आगळेवेगळे आऊट ऑफ बॉक्स असावे, असा प्रयत्न प्रत्येक प्राध्यापकाने करायला हवा. अभ्यासक्रमाच्या रचनेपेक्षा शिकविण्याची-शिकण्याची पद्धत जास्त महत्त्वाची. ती भविष्याचा वेध घेणारी, उद्याच्या गरजा ओळखून त्यानुसार सातत्याने बदलाला सामोरे जाणारी अशी हवी.आपल्या प्रयोगशाळांतून जे विज्ञानाचे प्रयोग शिकवतात ते जुने, वापरण्यात येणारी यंत्रे जुनी... आता अनेक क्षेत्रांत ऑटोमेशन झाले आहे. मेडिकल क्षेत्रात आधुनिक दवाखान्यातील यंत्रणा पाहिली की, हे लक्षात येते. इंटरनेटमुळे सेवा क्षेत्र पूर्ण बदलले आहे. हे बदल शिकण्यात, शिकविण्यात म्हणजेच अभ्यासक्रमात प्रतिबिंबित होणे गरजेचे आहे. आपल्याकडील अभ्यास मंडळे, विद्वत परिषदा, सिनेट या सर्वांचे या महत्त्वपूर्ण बाबींकडे पूर्ण दुर्लक्ष होते. याचे कारण या सर्व क्षेत्रांत प्रचंड प्रमाणात वैचारिक दारिद्र्य आहे. राजकीय घुसखोरी आहे. तिथला अजेंडा वेगळा, चुकीचा आहे. त्यामुळे 'रोग एकीकडे, उपचार दुसरीकडे' अशी अवस्था आहे.

विद्यापीठातील संशोधन, त्यातला भ्रष्टाचार, पीएच. डी.ची निरर्थकता हादेखील गंभीर अन् गांभीर्याने विचार करण्याचा मुद्दा आहे.

हे खरे की ते खरे? हिंदुत्ववादी की नवपुरोगामी?

शरद पवारांनी पसरवले पुन्हा एकदा मायाजाल

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी नुकत्याच एका मुलाखतीत राज्याच्या नव्हे तर संपूर्ण भारताच्या राजकीय वर्तुळात खळबळ वाजवली. ही खळबळ वाजवणारे मुख्य विधान होते ते प्रादेशिक पक्षांच्या विलीनीकरणाबाबतचे. या लोकसभा निवडणुकीनंतर अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसच्या जवळ येती किंवा काँग्रेसमध्ये विलीनही होतील, पवार यांनी या मुलाखतीत नमूद केले. आपल्या स्वतःच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष या पक्षाबद्दल बोलताना पवार यांनी आपला निर्णय निवडणुकीनंतर नेते आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करून केला जाईल, असे सांगताना दुसरीकडे काँग्रेस आणि आपल्या पक्षात फरक नाही. आपला पक्ष ही गांधी नेहरूंच्या विचारांना मानणारा पक्ष आहे, असे गर्भित उद्गार काढून आपल्या पक्षाचे भवितव्य सुचित केले आहे.

अर्थात राजकारणाच्या तालमीत आपल्याच काकांच्या तालमीत तयार झालेल्या अजित पवार यांनी पवारांच्या नेतृत्वाला आव्हान देऊन नवी वाट पकडल्यानंतर पवार यांच्या या विधानाचे केलेले विश्लेषणही महत्त्वाचे आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार पवार हे संभ्रम निर्माण करण्यासाठी अशी विधाने करीत असतात. याचा अर्थ पवारांनी हे विधान केले त्यामुळे भविष्यात त्यांचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होईल याची शाश्वती देता येत नाही, दुसरीकडे पवारांचा आजपर्यंतचा इतिहास पाहता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केल्याप्रमाणे पवार यांनी आत्तापर्यंत अनेकदा पक्ष स्थापन केले आणि पुन्हा काँग्रेस बरोबर जाऊन मिळाले. त्यामुळे पवारांच्या विधानातील 'हे खरे की ते खरे,' हा प्रश्न कायमच राहतो आणि ही शंका कायम राहणे हीच पवारांची आजपर्यंत खासियत राहिली आहे.

आपल्या पक्षाची संदिग्धता कायम ठेवतानाच पवार यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना कोंडीत पकडण्याचा डाव पुन्हा एकदा साधला आहे. भाजपापासून दूर करून मुख्यमंत्री पदाच्या बळीचा बकरा बनवून पवारांनी प्रथम उद्धव ठाकरे यांना अडचणीत आणले. त्यांना सत्तेची चव चाखल्यावर पुन्हा आपल्या आत्मचरित्र राजकीय समज नसलेले नेते ठरवले. तरी उद्धव ठाकरे यांची निष्ठा शरद पवार यांच्यापासून दळली नाही याचे सर्वात मोठे श्रेय उद्धव ठाकरे आणि शरद पवार या दोघांचेही प्रवक्ते असलेल्या खासदार संजय पवार यांना असावे. ठाकरे यांची पवार यांच्यावर असलेली श्रद्धा स्पष्ट करणारा एक व्हिडिओ सध्या व्हायरल झाला आहे. या व्हिडिओत पवार एका व्हिडिओ न दिसणार्या व्यक्तीशी चर्चा करीत असताना उद्धव ठाकरे यांचे त्या ठिकाणी आगमन झालेले असता ठाकरे यांची फारशी दखल न घेता उलट त्यांना आपण जरा बाहेर बसा, अशा अर्थाचे 'आदेश' देतात आणि ज्या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशामध्ये महाराष्ट्राला पेटून उठण्याची क्षमता होती त्यांचे पुत्र आणि राजकीय वंशज उद्धव बाळासाहेब ठाकरे पवार यांचा हा आदेश, 'हो मी जरा तिकडे फ्रेश होतो,' असे म्हणत पाळतात, तेव्हा स्वतःच्या पक्षाबरोबरच उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे भवितव्य आहे शरद पवार यांनी आपल्या हाती घेतले आहे, याबद्दल खात्री बाळगायला वाव असतो.

सोनिया गांधी भारतीय नसल्याच्या मुद्द्यावरून शरद पवार यांनी काँग्रेस मधून बाहेर पडून स्वतःचा पक्ष स्थापन केला. साडेतीन जिल्ह्याचे नेते अशा शब्दात त्यांची टिंगल केली जात असली तरीही त्यांनी राज्याच्या नव्हे तर देशाच्या राजकारणावर आपला प्रभाव ठेवला. ज्या सोनिया गांधी यांच्याशी उभा दावा मांडून त्यांनी स्वतंत्र पक्ष स्थापन केला त्यात सोनिया गांधी यांच्या काँग्रेस पक्षाशी त्यांनी पुन्हा साटेलोटे केले ही वस्तुस्थिती असली तरीही सोनिया गांधी यांच्या काँग्रेस पक्षाने ही त्यांना आपलेसे करून घेतले ही वस्तुस्थिती आहे. आज हेच पवार काँग्रेस आणि आपल्या पक्षात फरक नसल्याचे सांगत आहेत. त्याचप्रमाणे याच मुलाखतीत उद्धव ठाकरे आणि आपल्या विचारात फरक नसल्याचेही त्यांनी सांगितले आहे. यामुळे महाविकास आघाडी स्थापन झाल्यानंतर उद्धव ठाकरे काँग्रेसने विचाराचे झाले आहेत काय, अर्थात त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना तिलांजली दिली आहे काय, असा प्रश्न निर्माण करण्याचे काम केले आहे.

एकीकडे उद्धव बाळासाहेब ठाकरे आम्ही हिंदुत्वाला तीलांजली दिले नाही म्हणतात., बाबरी मशीद पतानाची जबाबदारी बाळासाहेबांनी घेतली याचा अजूनही अभिमानाने उल्लेख करतात, त्यांच्या उद्धव ठाकरे यांचे आणि आपले विचार जुळत असल्याचा दावा शरद पवार करत आहे. देश शरद पवार काँग्रेस आणि आपल्या पक्षाच्या विचारधारेत फरक नाही असेही म्हणतात याचा अर्थ उद्धव ठाकरे आणि काँग्रेस यांच्या विचारधारेत फरक नाही असा होतो. हा पवार यांचा संभ्रम पसरविण्याचा डाव आहे की उद्धव ठाकरे यांनी नवीन विचारसरणी स्वीकारली आहे याचा उलगडा ठाकरे यांनी केल्याशिवाय सर्वसामान्य शिवसैनिक आणि मराठी माणूस यांच्यातील संभ्रम दूर होणार नाही. त्याहीपेक्षा सर्वात मोठा संभ्रम जे कट्टर शिवसैनिक म्हणून उद्धव ठाकरे यांच्याबरोबर राहिले आहेत त्यांच्या मनामध्ये हा असेल की यापुढे आदेश कार्यप्रमुखांचा मानाचा की ते ज्यांचा आदेश मानतात त्या शरद पवारांचा....? काँग्रेस बरोबर जावं लागले तर माझे दुकान बंद करीन म्हणणार्या शिवसेनाप्रमुखांची पुढची पिढी काँग्रेसबरोबर गेली तर घेऊ कोणता झेंडा हाती?

बाणेर ग्रामदैवत श्री भैरवनाथ ऊत्सव साजरा ऊत्सव साजरा होत असतांना

वाहतूक विभागाचे नियोजन कोलमडले

बाणेर ऊत्सवा निमित्त वाहतूक विभागाने कोणत्याही प्रकारचे नियोजन केले नव्हते या कारणाने बाणेर, बालेवाडी,पाषाण,शिवाजीनगर ेणारे आणि जाणारे वाहनचालकांना फार त्रास सहन करावा लागला एकाही चौकात वाहतूक कर्मचारी हजर नव्हते एक एक तास वाहतूक जाम होत होती

- राजन चव्हाण
रिक्षा चालक बाणेर

बाणेर येथिल ग्रामदैवत श्री भैरवनाथ ऊत्सवा निमित्त डीजे लावण्यात आला होत याचा आवाज ईतका होत की, कानठळ्या बसत होत्या माझ्या घरी वयस्कर वडील यांना या आवाजामुळे फार त्रास झाला शेवटी कानात कापसाचा बोळा टाकून वडीलांना झोपवावे लागले एक तर रात्री अकरा वाजे पर्यंत ही मिरवणूक सूरू होती कोणाचेही यावर बंधन आणि नियोजन नव्हते

- प्रकाश तापकीर बाणेर गाव

बाणेर, बालेवाडी : बाणेर येथिल ग्रामदैवत श्री भैरवनाथांची यांत्रा दर वर्षी प्रमाणे यावेळेस धुमधडाक्यात साजरी करण्यात आली या यात्रे निमित्त श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट तर्फे योग्य नियोजन न केल्यामुळे या यात्रे निमित्त आलेल्या भाविकांना फार त्रास सहन करावा लागला यात वाहतूक विभागाचे या निमित्त लक्ष नसल्यामुळे वाहतूकीचा बोजवारा ऊडाला

दर वर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा ग्रामदैवत श्री भैरवनाथ ऊत्सव साजरा केला गेला पण या वेळेस ऊत्सवाचे स्वरूप वेगळे वाटत होते लोकसभेची निवडणूक या कारणाने या ऊत्सवाला वेगळे स्वरूप आले होते जोतो पक्षाचा नेता या ऊत्सवात सहभागी झाला असल्याचे दिसत होते

तर काही पडद्याआडून सहकार्य करतांना दिसत होते या ऊत्सवा निमित्त ट्रस्टने कोणत्याही प्रकारे योग्य नियोजन न केल्यामुळे दर्शना निमित्त भाविकांचे हाल होतांना दिसत होते एक तर पाच वाजे पर्यंत बाणेर येथे पाऊस सुरू होता या यात्रे निमित्त आपला व्यवसाय करण्यासाठी आलेले लहान लहान व्यवसाईक यांची सुध्दा तारांबळ ऊडाली होतीएक तर बाणेर गावचे ग्रामदैवत या ऊत्सवा काळात वाहतूक विभागाचा एकही कर्मचारी वाहतूकीचे नियोजन करतांना

दिसत नव्हता यामुळे बाणेर रोडवर दोन्ही कडे दोन दोन किलोमिटर पर्यंत वाहतूकिचा खोळंबा उडाला होता चौका चौकात रोडवरच फोरव्हिलर, टूव्हिलरची पार्कींग येणारे यात्रे करू करत असल्या कारणाने वाहतूकीचे नियोजनच बिघडले होते जाणारे येणारे वाहनचालकांना फार त्रास सहन करावा लागत होता.

या ऊत्सवा निमित्त डिजेचा वापर केला गेला डिजेचा आवाज नियमा नुसार नसल्या कारणाने स्थानिक जनतेला याचा त्रास भोगावा लागलाएक तर या ऊत्सवा निमित्त मंदिरा कडे येणारे वाहनांस बंदी करणे गरजेचे होते

परंतू याचे योग्य नियोजन करण्यात आले नव्हतेया यात्रे निमित्त आलेले व्यवसाईक लहान लहान गल्ली बोळात दूकान टाकून व्यवसाय करत होते यात खरेदी निमित्त आलेले भाविकांना वाहनाचा त्रास सहन करावा लागत होता ऊत्सव होता मग वाहनचालकांना बंदी का करण्यात आली नव्हती याचा त्रास जनतेला आणि व्यसाईकांना भोगावा लागला

या ऊत्सवा निमित्त वाहतूक विभागाचे पोलीस आणि बाणेर पोलीस चौकीचे कर्मचारी एकही ऊत्सवाचे तसेच वाहतुकिचे नियोजन करण्यासाठी हजर नव्हते एकतर श्री भैरवनाथ ट्रस्ट यांनी या ऊत्सवा निमित्त योग्य नियोजन करणे गरजेचे होते परंतू ही बाब या ऊत्सवा निमित्त झाली नसल्याची ओरड बाणेर विभागाची जनता करत आहे.

कुरुंदवाड येथे बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

कुरुंदवाड : म.बसवेश्वर जयंती कुरुंदवाड येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.म.बसवेश्वर जयंतीनिमित्त कुरुंदवाड येथील श्री कल्लेश्वर मंदिर येथे कल्लेश्वर महाराज शिवपिंडीस सौ.आणि श्री.महावीर कोप्पे यांच्या हस्ते महाभिषेक घालण्यात आला.त्यानंतर म.बसवेश्वर चौक येथे म.बसवेश्वर चौक स्तंभ आणि बसव प्रतिमेचे पुजन कुरुंदवाडचे सहाय्यक पोलिस निरीक्षक रविराज फडणीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी म.बसवेश्वरांच्या काळात अनुभव मंटपमध्ये कार्यरत असणारे संत शरण मडीवाळ माचिदेव, समगार हरळय्या,हुगार मदय्या,कुंभार गुंडय्या,अंबीगेर चौडय्या,तेली कण्णप्पा,हडपद अप्पण्णा आणि एकांत रामय्या यांच्या प्रतिमांचे वितरण रविराज फडणीस यांच्या हस्ते करण्यात आले.

शरण संतांच्या प्रतिमांचा स्वीकार दिपक परीट, सुनिल गायकवाड, भगवान गायकवाड, कृष्णा लोकरे, श्रीकांत माळी, विष्णूपंत माळी, बाळासाहेब कुंभार, गणेश कुंभार, महादेव आंबी, दिपक आंबी, प्रकाश फल्ले , दिपक वनकोरे, उमेश गुरव यांनी केला.

यावेळी प्रा.चंद्रकांत मोरे, सदाशिव माळी,दिपक पोमाजे,तानाजी आलासे,संजय डोंगरे, रमेश मिठारे,तातोबा पाटील, कुलदीप कुंभार,बाबू कोळी , नंदकुमार पाटील, ऋषिकेश चौगुले, शिवदास फल्ले, स्वप्नील कुंभार,काडगोंडा पाटील, अशोक कुंभार, सुधाकर औरवाडे,राजु गायकवाड, आप्पासाहेब एकसंबे,शिवमुर्ती स्वामी, मल्लाप्पा स्वामी,धनराज वाळवेकर, उमेश आंबी, अनिल पाटील, किशोर खोत, अनिल माळी,त्याचबरोबर म.बसवण्णा सामाजिक सेवा प्रतिष्ठानचे कार्यवाह सुधाकर तावदारे, अध्यक्ष सच्चिदानंद आवटी, ट्रस्टचे अध्यक्ष सदाशिव मगदूम,देवराज मगदूम, सुरेश माळी, सचिन तोडकर, संजय तोडकर,शंकर मेंगे आणि लिंगायत समाजाबरोबरच कुरुंदवाड शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शरण प्रतिमांच्या वितरणानंतर अक्कमहादेवी महिला भजनी मंडळाचे भजन कल्लेश्वर मंदिर येथे आयोजित करण्यात आले होते.म.बसवेश्वरांचा जन्मोत्सव सोहळा दुपारी ठिक १२.०० वा.साजरा करण्यात आला.यावेळी अक्कमहादेवी महिला भजनी मंडळाच्या सदस्या सुनंदा आवटी, विजयमा

ला आवटी, कांचन मेंगे,प्रेमिला कुंभार, सारिका आवटी, शोभा परीट, मालुताई कुंभार, सिंधुताई मडिवाळ, शारदा आवटी आणि महिला भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

कबड्डीतून खेळाडूंना भविष्य घडविण्याची संधी : अमरसिंह पाटील

बाल शिवाजी मंडळाच्यावतीने उन्हाळी कबड्डी प्रशिक्षणास सुरुवात

शिरोळ : गेल्या काही दिवसापासून कबड्डी खेळाला विशेष व्यासपीठ मिळाले आहे देशातील कबड्डी प्रो या स्पर्धेत ग्रामीण भागातील अनेक खेळाडू चमकत आहेत त्यामुळे कबड्डीचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन या परिसरातील खेळाडूंनी आपले भविष्य घडवण्याची संधी प्राप्त करून घ्यावी असे आवाहन बाल शिवाजी मंडळाचे उपाध्यक्ष व माजी नगराध्यक्ष अमरसिंह पाटील यांनी केले

येथील बाल शिवाजी मंडळाच्या वतीने दहा दिवसाचे उन्हाळी कबड्डी प्रशिक्षण शिबिरास मंडळाचे उपाध्यक्ष अमरसिंह पाटील व अध्यक्ष रावसाहेब देसाई सचिव प्रा आण्णासाहेब माने गावडे यांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत सुरुवात झाली यावेळी अमरसिंह पाटील हे उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करत होते

बाल शिवाजी मंडळाचे अध्यक्ष रावसाहेब देसाई म्हणाले की लहानपणापासूनच खेळाडूंना मैदानी खेळाची आवड असणे गरजेचे आहे भविष्यात कबड्डीतून आपले करिअर उज्वल घडेल यासाठी कबड्डी प्रशिक्षणाची गरज आहे मंडळाने आयोजित केलेल्या या प्रशिक्षण शिबिराचा सर्वांनीच लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले

मंडळाचे सचिव प्रा आण्णासाहेब माने गावडे यांनी उपस्थित खेळाळून कबड्डी खेळातील कौशल्याविषयी मार्गदर्शन करून प्रत्येकाने किमान दहा दिवस तज्ञ प्रशिक्षकांकडून कबड्डी खेळातील डावपेच शिकून घ्यावेत असे आवाहन केले

पत्रकार चंद्रकांत भाट यांना आत्मसन्मान गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला

कबड्डी प्रशिक्षक प्रा चंद्रकांत माने गावडे यांनी स्वागत व सूत्रसंचालन केले अमित संकपाळ यांनी आभार मानले यावेळी कबड्डी प्रशिक्षक शहाजान शेख संदीप चूडमुंगे नरेंद्र माने नंदू जाधव किरण माने गावडे माजी नगरसेवक विजय उर्फ दादासो कोळी एन वाय जाधव रावसाहेब पाटील मलिकवाडे पत्रकार चंद्रकांत भाट संजय माने मंडळाचे ज्येष्ठ खेळाडू नंदू गावडे उदय आवळे बुधाजी चूडमुंगे शाहूल कोळी धैर्यशील पाटील रामजी पाटील हरीश माने अजित पाटील बाळकृष्ण माने शुभम माने कृष्णा गावडे तुषार पुजारी सौरभ इंगळे विनायक सावंत पारस भाट नरेश माने प्रमोद यादव यांच्यासह मंडळाचे आजी-माजी खेळाडू प्रशिक्षणार्थी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

धावपळ टाळण्यासाठी आजच मतदान केंद्राची माहिती घ्या : जिल्हाधिकारी

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : जिल्ह्यातील मावळ, पुणे व शिरुर लोकसभा मतदार संघातील सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोमवार १३ मे रोजी मतदान होणार असून मतदानासाठी मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. मतदानाच्या दिवशी धावपळ टाळण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरून आजच मतदान केंद्राची माहिती घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे.

पुणे जिल्ह्यातील मतदारांची संख्या सर्वाधिक आहे. जिल्ह्यातील मावळ लोकसभा मतदार संघात ७ लाख १४ हजार २७३ पुरुष तर ६ लाख ४७ हजार ३१ महिला मतदार असून एकूण १३ लाख ६१ हजार ३९२ मतदार आहेत. पुणे लोकसभा मतदार संघात १० लाख ५५ हजार ६२ पुरुष व १० लाख ३५५ स्त्री असे एकूण २० लाख ५५ हजार ७४१ मतदार आहेत तर शिरुर लोकसभा मतदार संघात १३ लाख ३३ हजार ८९० पुरुष व ११ लाख ९९ हजार ९९७ महिला असे एकूण २५ लाख ३४ हजार ८८ मतदार आहेत.

मतदारांना मतदार ओळख चिठ्ठीचे वाटप करण्यात येत आहे. मतदार चिठ्ठी मिळाली नसल्यास जवळच्या मतदान केंद्र अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. जिल्हा निवडणूक प्रशासनाने पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात वॉर्डनिहाय तसेच विधानसभा मतदारसंघ स्तरावर मतदार सहाय्यता केंद्र स्थापन केले आहे. या केंद्राची मदत घेवून मतदान केंद्राची माहिती घेता येईल.

मतदारांच्या सोयीसाठी १९५० हा टोल फ्री क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आला असून यावरुन मतदार यादीतील नावाची माहिती घेता येईल. https://electoralsearch.eci.gov.in/ या संकेतस्थळावरदेखील मतदाराचा तपशील शोधता येणार आहे. वोटर हेल्पलाईन ॲपवरदेखील ही सुविधा आहे.

पात्र मतदारांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करुन लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, असे आवाहन डॉ. दिवसे यांनी केले आहे.

'दगडूशेठ' गणपती मंदिरात 'शारदेश मंगलम्' विवाह सोहळा

- श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे अक्षय्य तृतीयेनिमित्त आयोजन
- गणरायाला तब्बल ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : मंगलमूर्तीच्या भोवती केलेली आंब्यांची आरास... सनई व मंगलाष्टकांचे मंगल स्वर आणि लग्नसोहळ्यासाठी सजलेला मंडप अशा वातावरणात अक्षय्यतृतीयेनिमित्त दगडूशेठ गणपतीला ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य दाखविण्यासोबतच श्री गणेश आणि देवी शारदा यांच्या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असलेल्या अक्षय्यतृतीयेच्या मंगलदिनी गणरायाचे दर्शन व्हावे, याकरिता भाविकांनी पहाटेपासून रांगा लावल्या होत्या.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात आंबा महोत्सव आयोजित करण्यात आला. यामध्ये गणपती बाप्पांना ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला. पुण्यातील आंब्यांचे सुप्रसिद्ध व्यापारी देसाई आंबेवालेचे संचालक मंदार देसाई यांच्यावतीने हा नैवेद्य देण्यात आला. यावेळी ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, मंगेश सूर्यवंशी, अथर्व केदारी, पिनाक भट, बापू किकले, रवी पठारे यांसह कार्यकर्ते उपस्थित होते. गाणपत्य सांप्रदायातील परंपरेनुसार विवाह सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदा हे तिसरे वर्ष आहे.

दुपारी १२ वाजून ४१ मिनिटांनी भगवान श्री गणेश आणि देवी शारदा यांचा विवाह म्हणजेच शारदेश मंगलम् सोहळा थाटात पार पडला. सभामंडपात लग्नसोहळ्यातील सर्व धार्मिक विधींसह मंगलाष्टके देखील झाली. मंदिरात शुक्रवारी पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सुक्त अभिषेक झाला. त्यानंतर पहाटे ४ वाजता प्रख्यात गायिका मनिषा निश्चल यांनी स्वराभिषेकातून गायनसेवा अर्पण केली. सकाळी ८ वाजता विशेष गणेशयाग झाला. रात्री अखिल भारतीय महिला वारकरी मंडळाच्यावतीने उटीचे भजन देखील आयोजित करण्यात आले होते.

श्री गणेशांच्या दोन शक्तींना गाणपत्य संप्रदायात देवी सिद्धी आणि देवी बुद्धी या नावाने आळविले जाते. भगवंताच्या क्रियाशक्तीला देवी सिद्धी असे म्हणतात, तर भगवंताच्या ज्ञानशक्तीला देवी बुद्धी असे म्हणतात. अश्विन महिन्यामध्ये शरद ऋतू असल्याने या काळात प्रगट झालेल्या देवी बुद्धीला शारदा असे म्हणतात. शरद ऋतूतील चंद्राप्रमाणे तिची उज्ज्वलता, आल्हाददायकता असल्याने तिला शारदा असे म्हणतात. शरद ऋतू मधील प्रसन्नतेप्रमाणे देवी बुद्धीने प्रसन्नता प्राप्त होत असल्याने तिला शारदा असे म्हणतात. अशा देवी शारदेचा भगवान श्री गणेशांसोबतच्या महामीलनाचा सोहळा म्हणजे श्री शारदेश मंगलम आहे. वेदमूर्ती मिलिंद राहुरकर यांनी लग्नसोहळ्याचे पौरोहित्य केले. तसेच आंब्याचा प्रसाद ससूनमधील रुग्णांना, श्रीवत्समधील मुलांना, अपंग सैनिक पुर्नवसन केंद्र खडकी, वृद्धाश्रम व दिव्यांग मुलांच्या संस्था व मंदिरात भाविकांना देण्यात येणार आहे.

कासारवाडी जैन श्रावक संघाच्या वतीने वर्षीतप करणाऱ्या तपस्वींचा सन्मान समारोह उत्साहात संपन्न

कासारवाडी/प्रतिनिधी

कासारवाडी (पुणे) येथील जैन स्थानकाजवळील पगारिया सभागृहात बरसा दाता प.पू. गौतम मुनीजी म. सा. आणि प्रखर व्याख्याता प. पू. चेतन मुनीजी म. सा. यांच्या मंगलमय सान्निध्यात आठ वर्षीतप तपस्वींचा सन्मान समारंभ शानदार सोहळ्यात संपन्न झाला.

दोन्ही मुनिंनी वर्षीतप या पवित्र तपाचे महत्त्व विशद केले आणि प्रथम तीर्थंकर आदिनाथ भगवान यांच्या ४०० दिवसाच्या तपश्चर्येचा पारणा राजा श्रेयांस कुमार यांनी ईक्षु रसाच्या माध्यमातून केला. ही वर्षतप पाळण्याची पार्श्वभुमी त्यांनी सांगून या साधनेचे महत्त्व विशद केले.

यावेळी वर्षीतप तपस्वी श्रीमती मोतीबाई लुंकड चिंचवड स्टेशन (२६ वे वर्षतप,), सुमनजी गुगळे , सुनीताजी चोरडिया, लताबाई टाटिया, मंगलजी देसरडा, पुष्पाजी शिंगवी, विजयाजी देसरडा आणि भवरलालजी चोरडिया या आठ तपस्वीं चा सत्कार कासारवाडी श्री संघाचे वतीने करण्यात आला.

समारोहास साधना सदन श्री संघाचे अध्यक्ष विजय कांतजी कोठारी, पन्नालाल जी सुनावत, विजय धोका, आदेश खिवसरा, विजय भटेवरा, नितीन ओस्तवाल तसेच चंदनबाला महिला मंडळाच्या अध्यक्षा सज्जनबाई बोथरा, चंचलबाई कोठारी आणि इतर सदस्या पुण्याहून कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या, तसेच पिंपरी चिंचवड येथील विविध श्री संघांचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते, श्री अशोक लुंक़ड, राजेंद्रजी कर्णावट, शिंगवी ,सुरेश धाडीवाल ,जितेंद्र गुगळे, सागर जी सांखला, राजेंद्रजी बाठीया, सुनील जी कोठारी ,पी एम् जैन,संजय बोरा,सागर सांकला , सतीश मेहेर आदी मान्यवर उपस्थित होते सर्व उपस्थितांची उसाचे (ईक्षु) रसपान, आणि गौतम प्रसादीची व्यवस्था श्री संघाच्या वतीने करण्यात आली.

प्रारंभी श्री संघाचे माजी अध्यक्ष डॉ अशोककुमार पगारिया यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी संघाचे अध्यक्ष श्रेयस पगारिया,पंकज कांकरिया ,किरण भंडारी ,मयूर पगारिया ,स्नेहल भंडारी, संदीप कर्नावट , पंकज कटारिया, संदीप फुलफगर ,अमोल मुथा तसेच पार्श्वनाथ युवक मंडळ आणि सुशील बहु मंडळाचे सदस्य आदींनी पुढाकार घेतला, श्रेयस पगारिया यांनी सूत्रसंचालन केले.

दिशाभूल करणारे संदेश पाठविल्यास कडक कारवाई

पुणे : मतदारांच्या मतदार यादीतील नावावर डीलीट असा शिक्का मारला असल्यास करावयाच्या कार्यवाहीची चुकीची माहिती दिल्याबाबतचा संदेश व्हॉट्सअपद्वारे प्रसारीत केल्याबद्दल एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याच्यादृष्टीने प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनाने दिली आहे. असे चुकीचे संदेश, अफवा पसरविल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. मतदान यादीत नाव नसल्यास नमुना क्र.१७ चा अर्ज भरून आणि आपले मतदार ओळखपत्र दाखवून मतदान करता येणार असल्याचा दिशाभूल करणारा संदेश संबंधित व्यक्तीने व्हॉट्सअपद्वारे पसरविला आहे. अशा संदेशामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.

पुनावळे हॉस्पिटलच्या वतीने पाणपोई सुरू

पाणपोईच्या उद्घाटनप्रसंगी पुनावळे हॉस्पिटलचे डॉक्टर व कर्मचारी.

पिंपरी चिंचवड/प्रतिनिधी

पुनावळे हॉस्पिटलच्या वतीने शुक्रवारी दुपारी एकच्या सुमारास रस्त्याच्या बाजूला झाडाखाली पाणपोईची सुविधा सुरू करण्यात आली. यावेळी निकाळजेज हेल्थकेअर फाउंडेशनचे डायरेक्टर डॉ. राजकुमार निकाळजे, श्री. रमेश सोनवणे यांच्यासह पुनावळे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे कर्मचारी उपस्थित होते.

जवळजवळ एक महिनाभर पूर्वीची गोष्ट आहे काही वाटसरू हॉस्पिटलच्या समोर आल्यानंतर झाडाखाली आश्रय घेण्यासाठी बसत व उन्हाच्या तडाख्यापासून स्वतःचे संरक्षण करत असत दिवसेंदिवस वाढणारे रखरखते हे भयानक असे ऊन कमी कधी होईल हे देव जाणे पण याची तीव्रता कमी करण्यासाठी आपण काय करू शकतो हे पाहणे आणि त्यासाठी त्याप्रमाणे प्रयत्न करणे हे महत्त्वाचं.

खरंतर आपण पाहतो हॉस्पिटलच्याच बाहेर काय तर सगळीकडे जिकडेही लोक आपल्या कोणत्याही कामासाठी जातात तिथे पोहोचल्यानंतर स्वतः ची दुचाकी किंवा चार चाकी ही झाडाखालीच लावतात किंवा इतर कुठल्याही सावलीखाली गाडी लावण्याला प्राधान्य देतात.

झाडे आपल्यासाठी किती महत्त्वाचे आहेत त्याचेच हे एक उदाहरण, असो झाडे लावणे हे तर महत्त्वाचे आहेच आता येणाऱ्या पावसाळ्याच्या अगोदर जितकी जास्त झाडे आपण लावू तितकेच पर्यावरणासाठी, आपल्यासाठी, आपल्या पुढच्या पिढीसाठी , सर्वांसाठी हितकारक असणार आहे यात तीळ मात्र शंका नाही.

आपण पाहतो लोक वेगवेगळ्या प्रकारचे रिल्स बनवतात आणि ते त्याद्वारे महत्त्वाचे मेसेजेस लोकापुढे पाठवतात उदाहरणार्थ ऊन जास्त आहे उडणारे पक्षी किंवा प्राणी यांना पाणी मिळत नाही व पाण्या वाचून त्यांचा मृत्यू होऊ नये त्यासाठी घराबाहेर, खिडकीमध्ये, गॅलरीमध्ये वाटीमध्ये पाणी ठेवावे जेणेकरून त्यांना त्या पाण्याने त्यांची तहान भागवता येईल. पण आपल्या माणसांसाठी सुद्धा अशा प्रकारची पानपोई असायला हवीच की, पूर्वी बऱ्याच ठिकाणी पाणपोई असायच्या व त्यामुळे वाटसरूंना रस्त्यात कुठेही तहान जर लागली तर ती भागवली जायची पण आता परिस्थिती बदलली आता पाणी पैशाने उपलब्ध होत असल्याने पाणपोईचे प्रमाण हे कमी झाले आहे, ज्याच्याकडे पैसा आहे तो तर पैशाने पाणी घेईलच पण ज्याच्याकडे पैशाची कमतरता असते अशा लोकांना घरी गेल्याशिवाय त्यांना पाणी कसे मिळणार ? पाणी म्हणजे जीवन !!! पाणी म्हणजे पुण्य! पाणी पाजण्या पेक्षा दुसरे पुण्य नाही... असे मानले जाते तेव्हा याच धरतीवर डॉक्टर निकाळजेज् हेल्थकेअर फाउंडेशन आणि पुनावळे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने पुनावळे येथे आज १० मे २०२४, रोजी दुपारी एकच्या सुमारास रस्त्याच्या बाजूला झाडाखाली पाणपोई ची सुविधा सुरू करण्यात आली यावेळी निकाळजेज हेल्थकेअर फाउंडेशन चे डायरेक्टर डॉक्टर राजकुमार निकाळजे मिस्टर रमेश सोनवणे हे उपस्थित होते त्याचबरोबर पुनावळे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल चे कर्मचारी हेही उपस्थित होते. डॉक्टर निकाळजे म्हणाले आपल्याला जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा जे जे आपल्याला जमेल ते ते आपण करावे. त्याचबरोबर येणाऱ्या पावसाळ्यामध्ये प्रत्येकाने किमान एक तर झाड लावावे असे निवेदन त्यांनी केले.

वीजग्राहकांच्या सेवेसाठी महावितरणचे 'ऊर्जा चॅट बॉट' २४ तास उपलब्ध

- विविध माहिती देण्यासह तक्रार नोंदविण्यासाठी मदत

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : महावितरणने राज्यातील ३ कोटी वीजग्राहकांसाठी ऑनलाइनद्वारे घरबसल्या एका क्लिकवर सर्व सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा (अऑळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश) वापर करून वीजग्राहकांच्या संवादपर मदतीसाठी 'ऊर्जा' चॅट बॉट २४७ महावितरणच्या संकेतस्थळ व मोबाईल ॲपवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. इंग्रजी व मराठी भाषेतील या चॅट बॉटद्वारे महावितरणच्या विविध सेवांबाबत ग्राहकांना प्रश्न विचारता येत आहे तसेच नवीन वीजजोडणी, वीजबिल भरणा, तक्रार निवारण आदींबाबत माहिती घेण्याची सोय उपलब्ध आहे.

महावितरणच्या वीजसेवेसंदर्भात माहिती कुठे विचारावी आणि या सेवांचा घरबसल्या लाभ कसा घ्यावा हा प्रश्न आता संपुष्टात आला आहे. ग्राहकसेवांबाबत थेट प्रश्न विचारून विविध सेवांचा लाभ व तक्रारी नोंदविण्यासाठी 'ऊर्जा' नावाचे चॅट बॉट महावितरणच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने विकसीत केले आहे. राज्यातील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, कृषी व इतर ग्राहकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर 'ऊर्जा' चॅट बॉट ु.ारहरवळीलो.ळप ही वेबसाईट व महावितरणच्या मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. नवीन वीजजोडणी वा त्यासाठी केलेल्या अर्जाची सद्यस्थिती, वीजबिल भरणा किंवा वीजबिलाचा तपशील, जलद वीजबिल भरणा, मोबाइईल क्रमांक व ई-मेलची नोंदणी इतर विविध शुल्कांचा ऑनलाइन भरणा, स्वतः मीटर वाचन व सबमिशन, गो-ग्रीन नोंदणी, वीजवापर व बिलाचे कॅलक्यूलेटर आदींबाबत वीजग्राहकांना 'ऊर्जा' चॅट बॉट थेट मदत करीत आहे.



महावितरणच्या वीजसेवेबाबत माहिती हवी असल्यास 'ऊर्जा'च्या माध्यमातून संबंधित सेवा ग्राहकांसाठी थेट ऑनलाइनद्वारे उपलब्ध होणार आहे. संबंधित सेवेची थेट लिंक ग्राहकांना या चॅट बॉटमधूनच मिळणार आहे. यासोबतच वीजपुरवठा खंडित होणे तसेच वीजबिलांसह इतर तक्रारींबाबत संपूर्ण माहिती वीजग्राहकांना उपलब्ध होत आहे. यामध्ये तक्रार करण्यासाठी महावितरणचे २४ बाय ७ सुरू असलेले टोल फ्री क्रमांक, 'एसएमएस' क्रमांक, ई-मेल, मिस्ड कॉल सेवा आदींची माहिती चॅट बॉटद्वारे उपलब्ध आहे.

गेल्या मार्च महिन्यापासून कार्यान्वित झालेल्या 'ऊर्जा' चॅट बॉटचा वीजग्राहक मोठ्या संख्येने वापर करीत असून त्यांना वीजसेवा किंवा तक्रारी नोंदविण्याबाबत माहिती घेण्यासाठी महावितरणच्या कार्यालयांमध्ये जाण्याची आता आवश्यकता उरलेली नाही. मोबाईल क्रमांकाची नोंदणी केलेल्या ग्राहकांना मोबाईल क्रमांक किंवा ग्राहक क्रमांक सबमीट करून विविध सेवा घेण्यासाठी चॅट बॉटद्वारे महावितरणशी संवाद साधता येईल. तसेच इतर ग्राहकांना विविध सेवेचा लाभ घेता येत आहे.

आळंदीत चैत्र गौरी पूजनास महिलांची गर्दी; श्री रामलल्ला चंदन उटी दर्शनास माऊली भक्तांची गर्दी

पिंपरी चिंचवड/प्रतिनिधी

श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात प्रथा परंपरांचे पालन करीत चैत्र महिन्यात श्रीनां चंदन उटी लावण्यात येते. माऊलींचे संजीवन समाधीवर चंदन उटीतून श्रींचे श्री रामलल्ला वैभवी रूप साकारण्यात आले. श्रींचे वैभवी रूप दर्शनासह चैत्र गौरी पूजनास भाविकांनी माऊली मंदिरात तसेच ठिक ठिकाणचे मंदिरांत दर्शनास गर्दी केली. श्रींचे उटीसह गाभा-यात मोगरा फुलांची लक्षवेधी सजावट, आंब्यांची आरास, समीप श्रीराम मंदिर प्रतिकृती पाहण्यासह भाविकांनी गर्दी केली. स्वकामसेवा मंडळाचे वतीने भाविकांना पन्ह आणि डाळ प्रसाद वाटप करण्यात आले.

अक्षय तृतीये निमित्त आळंदी देवस्थान आणि स्वकाम सेवा मंडळाचे वतीने अध्यक्ष सुनील तापकीर आणि सर्व स्वकाम सेवक साधकांनी उटीचे लक्षवेधी नियोजन करीत चंदन उटी सेवा रुजू केली. मंदिरात चैत्र गौरी पूजन, चंदन उटी दर्शन उत्साहात झाले. महिला भाविकांनी कारंजा मंडपात गर्दी करून श्रींचे दर्शन घेत हळदी-कुंकू घेतले. आळंदी मंदिरातील कारंजा मंडपात चैत्र गौरी पूजना निमित आकर्षक सजावट करण्यात आली होती. चैत्र गौरीचे वैभवी रूप पाहण्यासह दर्शनास महिला, भाविक, नागरिकांनी गर्दी केली.



श्रीचे गाभाऱ्यात अक्षय तृतीये निमित्त संजीवन समाधीवर चंदन उटीतुन माऊलींचे श्री रामलल्ला रूप परिश्रम पूर्वक अभिजित धोंडफळे, मोरेश्वर जोशी, योगेश चौधरी, महेश जोशी यांनी साकारले. विविध वस्त्रालंकारांनी सजलेले श्रींचे रूप दर्शनास भाविकांनी गर्दी केली. आळंदी परिसरात साडेतीन मुहूर्ता पैकी एक असणारा अक्षय तृतीयेचा मुहूर्त साधत विविध नवीन उपक्रम आणि वाहन खरेदी निमित्त वाहनाची मंदिरा बाहेर पूजा मोठ्या उत्साहात करण्यात आली.

माऊली मंदिरातील प्रथा परंपरांचे पालन करीत अक्षय तृतीये निमित्त प्रथम घंटानाद, काकडा, श्रींना पवमान अभिषेक, दुधारती, पूजा आणि भाविकांचे दर्शन तसेच महिलांचा हळदी-कुंकू असे कार्यक्रम उत्साहात झाले.

अक्षय तृतीया दिनी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त विधीतज्ञ राजेंद्र उमाप यांनी श्रींचे दर्शन घेत मंदिरास भेट दिली. या प्रसंगी व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, तुकाराम माने, संजय रणदिवे, श्रीकांत लवांडे, ज्ञानेश्वर पोंदे, सोमनाथ लवंगे आणि सेवक यांनी देवस्थानच्या प्रथा प्रमाणे धार्मिक महत्व ओळखून भाविकांच्या दर्शनाची व्यवस्था ठेवली. संस्थांनचे संजय लवांडे, सोमनाथ लवंगे, महेश गोखले आदींनी मंदिरातील तसेच भाविकांचे दर्शनाचे नियोजन केले.

येथील नव्याने भव्य दिव्य विकसित करण्यात आलेल्या श्री लक्षशांती गणेश मंदिरात श्रींचे मंदिर गाभाऱ्यातलक्षवेधी आंब्यांची सजावट करण्यात आली. अक्षय तृतीये निमित्त परिसरातील नागरी , भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. यासाठी श्रींचे मंदिर निर्माते शांता येळवंडे, लक्ष्मण येळवंडे, सचिन येळवंडे, संतोष येळवंडे, सागर येळवंडे आणि येळवंडे परिवार यांनी परिश्रम घेतले. यावेळी भाविकांनी श्रींचे दर्शनास तसेच पूजा, आरास पाहण्यास गर्दी केली. भाविकांना मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात प्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी श्री व सौ शांता लक्ष्मण येळवंडे परिवाराने भाविकांचे स्वागत केले.

येथील श्री संत गोरोबाकाका समाधी मंदिरात अक्षय तृतीया निमित्ताने भगवान परमात्मा श्री विठ्ठल अवतार चंदन उटी परिश्रम पूर्वक साकारण्यात आली. यासाठी संत गोरोबा काका यांचे वंशपरंपरागत पुजारी किशोर दाते, किरण दाते आणि त्यांचे सहकारी बल्लाळेश्वर वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

वादळी पावसाने घरे, कांदा चाळीचे नुकसान

झाडे उन्मळून पडल्याने वीज पुरवठा विस्कळीत

नाशिक : जिल्ह्यातील अनेक भागात वादळी वारा, विजांच्या गडगडाटासह झालेल्या अवकाळी पावसात अनेक घरांवरील पत्रे उडाले तर काही ठिकाणी कांदा चाळींचे नुकसान झाले. चांदवड तालुक्यात १० ते १२ घरांचे नुकसान झाले. नाशिक, दिंडोरी, चांदवड तालुक्यासह अभोणा शिवारात वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. नाशिक शहरात झाडे उन्मळून पडल्याने अनेक भागातील वीज पुरवठा खंडित झाला.

मागील दोन, तीन दिवसांपासून वातावरणात कमालीचा उकाडा जाणवत आहे. शुक्रवारी दुपारनंतर वातावरण अकस्मात ढगाळ होऊन वादळी वाऱ्याला सुरुवात झाली. विजांच्या कडकडाटात कमी-अधिक प्रमाणात अवकाळी पावसाने हजेरी लावली. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माहितीनुसार चांदवड तालुक्यातील कानमांडळे गावात वादळी वाऱ्याने १० ते १२ घरांचे अंशत: नुकसान झाले.

वीज पडून गाय मृत्युमुखी झाली. उभोणा शिवारात जोरदार वादळी पावसाने अभोणा-कळवण रस्त्यावर कांदा चाळीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. दोन घरांचे पत्रे उडाले. यात कुठलीही जिवितहानी झाली नाही. दिंडोरीतील अनेक भागात अर्धा तास वादळी पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी शिडकावा झाला. नाशिक शहरात जोरदार वाऱ्यामुळे अनेक भागात मोठी झाडे उन्मळून पडली.

फांद्या पडून वीज वाहिन्यांचे नुकसान होऊन सिडको, उत्तमनगर, हिरावाडी, पंचवटी, गंगापूर रोड, रविवार कारंजा, मेनरोड आदी भागातील वीज पुरवठा खंडित झाला. कर्मचाऱ्यांच्या मदतीने उन्मळून पडलेली झाडे व फांद्या बाजुला करण्याचे काम हाती घेतले गेले.

काही ठिकाणी नव्याने खांब उभारत वीज पुरवठा सुरळीत करण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. अनेक भागातील वीज पुरवठा तासाभरात पूर्ववत करण्यात आल्याचा दावा महावितरणने केला आहे.

छत्तीसगडमध्ये १२ नक्षलवाद्यांना कंठस्नान

तीन जिल्ह्यातील १२०० जवानांची संयुक्त कारवाई

गडचिरोली : सत्ता परिवर्तनानंतर छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांविरोधात धडक कारवाई सुरूच असून सुकमा जिल्ह्यात १० मे रोजी सुरक्षा जवान व नक्षलवाद्यांमध्ये उडालेल्या चकमकीत १२ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात जवानांना यश आले आहे. या कारवाईत तब्बल १२०० जवानांचा सहभाग होता.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणा अलर्ट आहे. त्यातच माओवाद्यांचा 'टीसीओसी' कालावधी सुरु आहे. या कालावधीत ते सुरक्षा जवानांवर हल्ले करुन घातपात करण्याची शक्यता असते. १० मे रोजी सुकमा जिल्ह्याच्या सीमेवरील गंगालूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पीडिया जंगलात नक्षल वादी व पोलिसांत जोरदार चकमक उडाली. छत्तीसगडमधील विजापूर, बस्तर व सुकमा या तीन जिल्ह्यांच्या तब्बल १२०० जवानांनी संयुक्तपणे घेरुन नक्षलवाद्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. यात १२ नक्षलवाद्यांना ठार करण्यात यश आले आहे. मृतांची ओळख पटविण्याचे काम सुरु आहे.

घटनास्थळाहून सुरक्षा जवानांनी मोठा शस्त्रसाठा जप्त केला आहे. या चकमकीदरम्यान आणखी काही माओवादी जखमी असल्याची माहिती आहे, त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. घटनास्थळी विशेष पोलिस महानिरीक्षक, तीनही जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक असे वरिष्ठ अधिकारी तळ ठोकून आहेत.१० दिवसांतील दुसरे मोठे एन्काऊंटरछत्तीसगड सीमेवरील अबूझमाड जंगलात महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला ३० एप्रिल २०२४ रोजी छत्तीसगडमधील सुरक्षा जवान व नक्षलवाद्यांत चकमक झाली होती. यात दहा नक्षल्यांना ठार करण्यात जवानांना यश आले होते. त्यानंतर दहा दिवसांतच बारा जवानांचा खात्मा केल्याने हे सुरक्षा यंत्रणेचे मोठे यश मानले जात आहे.

रेल्वे गाड्यांमध्ये खाद्य पदार्थ विकणाऱ्यांवर कारवाईचा धडाका

नागपूर : रेल्वेगाड्यांमध्ये अनिधकृतपणे खाद्यपदार्थ विकणाऱ्यांविरुद्ध रेल्वेने मोहीम उघडली नागपूर विभागातील वेगवेगळ्या ठिकाणी तीन दिवसात तब्बल २७ विक्रेत्यांना अटक करण्यात आली आहे.

रेल्वे प्रवाशांना अन्नातून विषबाधा झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. शिवाय विनापरवाना रेल्वेगाडी किंवा रेल्वे स्थानकावर खाद्यपदार्थ विक्रीस मनाई आहे. असे असताना विविध रेल्वेगाड्यांमध्ये अनधिकृतपणे खाद्यपदार्थ विकणाऱ्यांची संख्या मोठी आहे. आता मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने उन्हाळ्यात कारवाई सुरू केली आहे.

केटरिंग निरीक्षक, तिकीट तपासणी कर्मचारी आणि रेल्वे पोलीस कर्मचारी यांचा समावेश असलेले एक पथक तयार करण्यात आले आहे. या मोहिमेदरम्यान, पथकाने तीन दिवसांत वेगवेगळ्या गाड्यांमध्ये केलेल्या कारवाईत एकूण २७ अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई केली. हे विक्रेते शिजवलेले खाद्यपदार्थ, अनधिकृत ब्रँडच्या पाण्याच्या बाटल्या, पाकीटबंद नाश्ता, शीतपेये आणि चहा/कॉफी रेल्वेगाड्या आणि स्थानक परिसरात विक्री करताना आढळून आले.

७ मे रोजी नागपूर स्थानकावर चार अनधिकृत विक्रेते पकडले गेले. ८ मे रोजी गोंदिया-कोल्हापूर महाराष्ट्र एक्सप्रेसमध्ये एसी डब्यांच्या गेटजवळ पाण्याच्या बाटल्या आणि आंब्याच्या रसाचे बॉक्स ठेवण्यात आले होते. या प्रकरणी २० हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला.

१० मे रोजी नागपूर स्थानकावर नऊ अनधिकृत विक्रेत्यांना पकडण्यात आले. तसेच विविध रेल्वे गाड्यांमधून नागपूर ते बल्लारशाह स्थानकादरम्यान १४ जणांना पकडण्यात आले. अनधिकृत विक्रीमुळे केवळ प्रवाशांना गैरसोयच होत नाही तर त्यांच्या आरोग्यालाच धोका निर्माण होतो.

रेल्वेच्या आवारात किंवा रेल्वेगाड्यांमध्ये अनधिकृतपणे विक्री करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा रेल्वे प्रशासनाने दिला आहे. प्रवाशांनी अनधिकृत विक्रेते आढळल्यास तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना कळवावे, असे आवाहन विभागीय रेल्वे व्यवस्थापक मनीष अग्रवाल यांनी केले.

राज्यातील उष्माघाताच्या रुग्णसंख्या २०० पार

मुंबई : राज्यामध्ये वाढत्या तापमानामुळे दिवसेंदिवस उष्माघाताच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. मागील दोन महिन्यांमध्ये उष्माघाताच्या रुग्णांची संख्या २०० पार गेली आहे. नाशिक, बुलढाणा, जालना आणि धुळे या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक रुग्णांची नोंद झाली आहे.

राज्यामध्ये मार्च, एप्रिल आणि मे महिन्यामध्ये वाढत्या तापमानामुळे उष्णतेची लाट आली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसहून अधिक आहे. त्यामुळे नागरिकांना उष्माघाताचा त्रास होण्याचे प्रमाण वाढत आहे. मार्च व एप्रिल या दोन महिन्यांमध्ये राज्यभरात उष्माघाताचे तब्बल २०५ रुग्ण आढळले आहेत. सर्वाधिक रुग्ण नाशिक (२३), बुलढाणा (२१), जालना आणि धुळ्यामध्ये (प्रत्येकी २०) आढळले आहेत. धुळे जिल्ह्यात २६ एप्रिलपूर्वी उष्माघाताच्या सर्वाधिक रुग्णांची नोंद झाली होती.

राज्यामध्ये २६ एप्रिलपासून ५ मेपर्यंत २१ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. जालनामध्ये सर्वाधिक ११ रुग्णांची नोंद झाल्याने रुग्णांची संख्या २० झाली आहे, त्याखालोखाल नाशिक आणि बुलढाण्यामध्ये प्रत्येकी ६ रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे नाशिक आणि बुलढाण्यातील रुग्णांची संख्या अनुक्रमे २३ आणि २० वर पोहोचली आहे. मात्र धुळ्यातील रुग्णांची संख्या स्थिर आहे. दरम्यान, मार्चच्या तुलनेत एप्रिलमध्ये उष्माघाताच्या रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मार्चमध्ये अवघे ४० रुग्ण सापडले होते, तर एप्रिलमध्ये तब्बल १६५ रुग्ण आढळले आहेत.

उष्णतेची लाट कधी येते

सर्वसाधारणपणे एखाद्या प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ अंश सेल्शियसने जास्त असेल तर त्याला उष्णतेची लाट म्हणतात किंवा एखाद्या भागात सलग दोन दिवस तापमान ४५ डिग्री सेल्शियसपेक्षा जास्त असेल तर त्या भागात उष्णतेची लाट आली आहे, असे म्हटले जाते.

जिल्हानिहाय रुग्ण संख्या

नाशिक - २३
बुलढाणा - २१
जालना - २०
धुळे - २०
सोलापूर - १८
सिंधुदुर्ग - १०
उस्मानाबाद - ८
पुणे - ७

अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर सांगलीत १२० गाड्या हापूस आंब्यांची आवक

सांगली : सांगलीतील विष्णू अण्णा फळ मार्केटमध्ये अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर दोन दिवसांत तब्बल १२० गाडी आंब्याची आवक झाली आहे. शुक्रवारीआंबाखरेदीसाठी जिल्ह्यातील व्यापारी व ग्राहकांनी तुफान गर्दी केली होती. देवगड हापूसआंबा४०० ते ५०० रुपये डझन व कर्नाटक हापूस २५० ते ३०० रुपये डझन असे भाव होते.

विष्णूअण्णा फळ मार्केटमध्ये अक्षय तृतीयेनिमित्त गुरुवार आणि शुक्रवारी मोठ्या प्रमाणात आंबा आवक झाली होती. पश्चिम महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकामध्ये सांगली हे आंब्याच्या विक्रीसाठी मोठे मार्केट समजले जाते. कोकणातील देवगड, रत्नागिरी, मालवण, चिपळूण लांजा, राजापूर, आधी परिसरातून देवगड हापूस, पायरी, लालबाग व मालवण आंब्याची गेल्या दोन दिवसात १२० गाड्यांची आवक झाली आहे, अशी माहिती सांगलीबाजारसमितीचे सचिव महेश चव्हाण यांनी दिली.

मुहूर्तावर देवगड हापूस आंबा प्रति डझन ४०० ते ५०० रुपये तर चार डझनाची पेटी दोन हजार रुपये असे भाव होते. केशर आंबा ७० ते १०० रुपये किलो, तसेच कर्नाटक हापूससुद्धा मोठ्या प्रमाणात आवक सुरू आहे. कर्नाटक, आंध्र, तेलंगणा व तामिळनाडू परिसरातून दररोज ३० ते ४० गाड्या भरून आंबा सांगली मार्केटमध्ये विक्रीसाठी येतो. कर्नाटकी हापूसचा दर २०० ते २५० रुपये डझन, तर पायरी २५० ते ३०० रुपये डझन, असा किरकोळ विक्रीचा सध्या दर आहे.

आंब्याचे डझनाचे दर

देवगड हापूस : ४०० ते ५०० रुपये रत्नागिरी हापूस : ३०० ते ४०० रुपयेकर्नाटक हापूस : २५० ते ३०० रुपयेपायरी : २५० ते ३०० रुपयेकेशर : ७० ते १०० रुपये किलो

अक्षय्यतृतियेला अंबाबाईची झोपाळ्यावरील मनोहारी पूजा

कोल्हापूर : वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त असलेल्या अक्षय्यतृतियेला करवीर निवासिनी श्री अंबाबाईचा वसंतोत्सव साजरा करता शुक्रवारी देवीची झोपाळ्यावरील मनोहारी पूजा बांधण्यात आली. यादिवशी आंब्याला विशेष मान असल्याने मूळ मूर्तीची आंब्याच्या राशीतील सालंकृत पूजा झाली. वैशाख वणव्यात झोपाळ्यावर बसून झुला घेत असलेल्या देवीचे हे रुप पाहण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

मेमधील वैशाख वणवा असला तरी हा वसंतोत्सव असतो. याकाळात प्रत्येक देवाचा दोलोत्सव म्हणजे हिंदोळ्यावरील पूजा बांधण्याची पद्धत आहे. त्यानुसार परंपरेने अक्षय्यतृतियेला अंबाबाईच्या उत्सवमूर्तीची गरूड मंडपात हिंदोळ्यावरील मनोहारी पूजा बांधली जाते. दुपारी चार वाजता देवीची उत्सवमूर्ती गाभाऱ्यातून गरूड मंडपात आणण्यात आली.

चांदीच्या सिंहासनावर अंबाबाईची मूर्ती विराजमान झाल्यानंतर झोपाळ्यासारखा तख्तपोशीला बांधण्यात आले. त्याला फुलापानांनी सजवल्यानंतर देवीची सालंकृत पूजा बांधली की अंबाबाईला हळद कुंकू वाहून कैरीची डाळ आणि पन्हं यांचा नैवेद्य दाखवण्यात आला. देवीच्या एका बाजूला हवालदार आणि दुसऱ्या बाजूला सोन्याचा दंड घेऊन देवीला हाताने झोका देत होते. वैशाख वणव्यात शांतपणे असा झुला घेत बसलेल्या अंबाबाईचे अलौकिक रुप पाहणे म्हणजे एक सोहळाच असतो.

शुक्रवार असल्याने रात्री देवीची पालखी झाल्यानंतर हा सोहळा पूर्ण झाला. दुसरीकडे देवीच्या मूळ मूर्तीची आंब्याच्या राशीतील पूजा बांधण्यात आली. सध्या गरूड मंडप नाजूक अवस्थेत असल्याने तेथे कोणालाही सोडले जात नाही. तेथे फक्त अंबाबाईच्या उत्सवमूर्तीचे नित्य व नैमित्तीक धार्मिक विधी केले जातात. भाविकांना देवीची झुल्यातील पूजा पाहता यावी, दर्शन घेता यावे यासाठी गणपती मंदिराच्या मागील बाजूने भाविकांची स्वतंत्र रांग करण्यात आली

हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसांसाठीच्या सदनिका

२१ घरे आगामी सोडतीत समाविष्ट

मुंबई : हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसांसाठी राखीव असलेली घोडपदेव येथील २१ घरे गिरणी कामगारांसाठीच्या २,५२१ घरांच्या आगामी सोडतीत समाविष्ट करण्याचा निर्णय म्हाडाच्या मुंबई मंडळाने घेतला आहे. राज्य सरकार आणि इतर सरकारी यंत्रणा २१ हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसांचा शोध घेण्यात अयशस्वी ठरल्याने गेली अनेक वर्षे ही २१ घरे रिक्त आहेत. त्यामुळे राज्य सरकारने ही घरे गिरणी कामगारांना सोडतीद्वारे वितरीत करावी, असे निर्देश म्हाडाच्या मुंबई मंडळाला दिले आहेत.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात हौतात्म्य पत्करलेल्या १०६ जणांमध्ये २३ गिरणी कामगारांचा समावेश होता. या हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसांसाठी राज्य सरकारने १२ वर्षांपूर्वी घोडपदेव न्यू हिंद मिल येथील २३ घरे राखीव ठेवली होती. ही घरे हुतात्म्यांच्या वारसांना मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

अक्षय तृतीयेनिमित्त घरांची विक्री तेजीत, मे महिन्यात केवळ दहा दिवसांत तीन हजारांहून अधिक घरांची विक्री त्यांच्या वारसांचा शोध घेत पात्रता निश्चिती करण्याची जबाबदारी गृहनिर्माण विभागावर सोपविण्यात आली होती. त्यानुसार गृहनिर्माण विभागाने वारसांचा शोध घेण्यास सुरुवात केली. मात्र, आजवर २३ पैकी केवळ दोनच वारसांचाच शोध घेण्यात गृहनिर्माण विभागाला यश आले. या दोन वारसांना घराचे मोफत वितरण याआधीच करण्यात आले आहे.

मात्र, २१ वारसांचा शोध लागत नसल्याने चार-पाच वर्षांपूर्वी गृहनिर्माण विभागाने देशभरातील महत्त्वाच्या वर्तमानपत्रात वारसांची नावे प्रसिद्ध करून त्यांना कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन केले होते. मात्र यानंतरही वारस पुढे न आल्याने २१ घरे रिक्तच आहेत.

ही घरे सर्वसामान्य गिरणी कामगारांना सोडतीद्वारे उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव २०२१ मध्ये गृहनिर्माण विभागाकडे पाठविण्यात आला होता. हा प्रस्ताव मान्य करून राज्य सरकारने घोडपदेवमधील २१ घरे गिरणी कामगारांच्या सोडतीत समाविष्ट करावी, असे पत्र गृहनिर्माण विभागाने १९ जून २०२३ रोजी म्हाडाला पाठविली.

'एमएमआरडीए'च्या भाडेतत्त्वावरील गृहप्रकल्पातील २,५२१ घरे म्हाडाला सोडतीसाठी उपलब्ध असतील. या घरांच्या दुरुस्तीसाठी 'एमएमआरडीए'ने निविदा मागविल्या आहेत. या वर्षात २,५२१ गिरणी कामगारांच्या घरांची सोडत मार्गी लावण्याचे मुंबई मंडळाचे नियोजन आहे.

नरहरी झिरवळ राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वाटेवर

नाशिक : दिंडोरी लोकसभा मतदार संघात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या बैठकीत विधानसभेचे उपसभापती तथा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवळ हे उपस्थित राहिल्याने महायुतीच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे. शिंदे गटाचे आमदार सुहास कांदे यांनी राष्ट्रवादीचे नेते, पदाधिकारी शरद पवार गटाचा प्रचार करीत असल्याचा आरोप याआधीच केला होता. त्यास या उपस्थितीने एकप्रकारे दुजोरा मिळाल्याने झिरवळ हे पुन्हा शरद पवार गटाच्या मार्गावर असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर साडेपाच हजारांहून अधिक वाहन खरेदी

मुंबई : साडेतीन मुहूर्तांपैकी एक असणाऱ्या अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर मोठ्या प्रमाणावर वाहन खरेदी करण्यात आली. त्यामुळे मुंबई महानगरातील रस्त्यावर शुक्रवारी अनेक नवीन वाहने दिसून आली. यंदा १ ते १० मे या कालावधीत मुंबई शहर आणि उपनगरांतील मुंबई सेंट्रल, वडाळा, अंधेरी आणि बोरिवली या चार आरटीओमधून तब्बल ५,८६१ वाहनांची नोंदणी झाली. यात ३,८०० दुचाकी आणि २,०६१ चारचाकींचा समावेश आहे.

अक्षय्य तृतीयेच्यानिमित्ताने गेल्या १० दिवसांपासून वाहन खरेदी, नोंदणी सुरू होती. मुंबईत बोरिवली आरटीओमध्ये

सर्वाधिक चारचाकी वाहनांची नोंदणी झाली. या आरटीओमधून ६१८ चारचाकी आणि १,०१३ दुचाकीची नोंदणी झाली. तर वडाळा आरटीओमध्ये सर्वाधिक दुचाकी वाहनांची नोंदणी झाली. वडाळा आरटीओत १,०६७ दुचाकी आणि ४५३ चारचाकी वाहनांची नोंद झाली.

वडाळा आरटीओ
चारचाकी - ४५३
दुचाकी - १,०६७
मुंबई सेंट्रल आरटीओ
चारचाकी - ४९८
दुचाकी - १,०१८
अंधेरी आरटीओ
चारचाकी - ४९२
दुचाकी - ७३२
बोरिवली आरटीओ
चारचाकी - ६१८
दुचाकी - १,०१३

स्वच्छता अभियानात उत्कृष्ठ कामगिरीचे पारितोषिक पटकाविल्याबद्दल

शासनाने बक्षीस म्हणून दिलेली सहा वाहने वापराविना धूळखात

महाबळेश्वर/प्रतिनिधी

स्वच्छता अभियानात उत्कृष्ठ कामगिरीची नोंद करून पारितोषिक पटकाविल्या बद्दल शासनाने बक्षीस म्हणून पालिकेतील स्वच्छता विभागासाठी सहा वाहने दिली; परंतु गेली अनेक महिने ही वाहने वापराविना पालिकेच्या आवारात धूळखात पडली असून स्वच्छता विभागात मात्र खाजगी ठेकेदारांची वाहने काम करीत आहेत. पालिकेच्या या कारभाराविषयी शहरातून उलटसुलट चर्चा सुरू आहे. ठेकेदारांची वाहने बंद होऊन पालिका स्वत:ची वाहने केव्हा सुरू करणार? असा प्रश्न शहरातून विचारला जात आहे.

महाबळेश्वर शहर व परीसरातुन कचरा गोळा करण्यासाठी ठेकेदारीवर वाहने घेतली आहेत ही वाहने शहराच्या प्रत्येक विभागात फिरून ओला सुका घातक अशा चार प्रकारचा कचरा गोळा करते स्वच्छता विभागात पालिकेने केलेल्या कामगिरीचे शासनाने कौतुक केले आहेच आणि त्याच वेळी पालिकेला उत्तम पारीतोषिक देवुन सन्मानित देखिल केले आहे त्याच प्रमाणे स्वच्छता विभागासाठी शासनाने दोन रीक्षा वरील घंटा गाडया कचरा वाहतुकीसाठी दोन टाटा योध्दा ही मध्यम आकाराची वाहने व दोन ट्रॅक्टर अशी सहा वाहने दिली आहेत विशेष म्हणजे शासनाने दिलेली ही वाहने गेली अनेक महीने पालिकेच्या आवारात धूळखात उभी आहेत.

शासनाने दिलेली वाहने ही धुळखात उभी असली तरी खाजगी ठेकेदारांची वाहने ही रोज स्वच्छता विभागात सुरू आहेत ठेकेदारांच्या वाहनांना पालिकेतनु दरमहा लाखो रूपये खर्च केला जात आहे हा सर्व पैसा जनतेचा असुन पालिकेतील हे ठेकेदारी राज कधी संपुष्टात येणार असा सवाल नागरीक करू लागले आहेत खाजगी ठेकेदारांचे दुकान चालविण्याची जबाबदारीच पालिकेने घेतली असल्याने ठेकेदारांची वाहने रस्त्यावर फिरत असुन शासनाने दिलेली वाहने ही पालिका आवारात धुळ खात पडली आहेत पालिकेचे कर्तबगार प्रशासक शासनाने दिलेली वाहने वापरासाठी मुहूर्त शोधत आहेत का असा सवालही शहरातनु विचारला जात आहे.

सार्वजनिक ठिकाणी 'रील्स' बनविणे पडले महागात!

तिघा जणांवर पोलिसांची कारवाई

वडूज : शनिवारी ४ मे आठवडा बाजार दिवशी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास वडुज पोलीस ठाणे हद्दीत वडूज बाजारपेठ व एसटी स्टॅन्ड परिसरात काही युवकांनी गाण्याच्या तालावर चालत्या दुचाकीवरून बादलीतील पाणी अंगावर ओतून घेत सार्वजनिक गर्दीच्या ठिकाणी मोबाईल रील्स बनवून सोशल मीडियावरून प्रसारित केली असल्याची माहिती सातारा सायबर सेल कडून वडूज पोलिसांना मिळताच पोलिसांनी याप्रकरणी तिघांवर कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार अविनाश अशोक किरतकर, वय १९ वर्ष, धंदा मजुरी, राहणार कर्मवीरनगर, वडुज, ता-खटाव, हर्षद विनोद बनसोडे, वय १८ वर्ष, चंदा-शिक्षण, राहणार डांबेवाडी, ता-खटाव, अविनाश अंकुश इंगळे, वय-१९ वर्ष, रा- नवीन कोर्ट शेजारी, वडुज, ता- खटाव यांनी मोटरसायकल वरुन सार्वजनिक ठिकाणी पाण्याची बादली घेवून चालू मोटरसायकलवर अंगावर पाणी ओतून उन्हामध्ये 'गरम हवा का पहिला झोका...'' या गाण्यावर असभ्य वर्तन करुन रिल्स बनवून सदरची रिल्स इन्स्टाग्राम वरुन व्हायरल केली.या तरुणांनी असभ्यतेचे वर्तन केल्याने त्यांचा व्हायरल केलेला व्हिडीओ सायबर सेल सातारा यांचेकडुन प्राप्त झाल्याने त्याचे आधारे या तरुणांची त्यांच्या मोटार सायकल नंबरच्या आधारे माहिती प्राप्त करुन पोलिसांनी त्यांचा शोध घेतला.या तरुणांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे सदर रिल्स अनुशंगाने विचारपुस केली असता त्यांनी सदर रिल्स बनवून इंन्स्टाग्राम वर अपलोड करुन वायरल केल्याचे सांगितल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ११०/११७ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.याबाबत न्यायालयात अहवाल पाठविणेत आला आहे. अशा प्रकारे कोणीही रिल्स बनवुन व्हायरल करु नयेत अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल.असं आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आलं आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख सातारा, श्रीमती आंचल दलाल,अपर पोलीस अधीक्षक सातारा, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे,सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल माने, पोलिस उपनिरीक्षक अमीत शिंदे, प्रशांत पाटील, द-याबा नरळे, गणेश शिरकुळे, कुंडलिक कटरे यांनी केली आहे.

जातीवाचक शिवीगाळ प्रकरणी कोरेगावात दोघांवर गुन्हे दाखल

कोरेगाव : नवीन एसटी स्टँड,लक्ष्मी नगर कोरेगाव हद्दीत दारू पिऊन लय मस्ती आली आहे का तुम्हाला एक एकाला दाखवतो असे म्हणत हात व विटेने मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केली. याप्रकरणी यश दत्तात्रय बोतालजी यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

याप्रकरणी महेश सुरेश वाल्मिकी व प्रमोद उर्फ विजय बाळकृष्ण घोरपडे यांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास डीवायएसपी सोनाली कदम करत आहेत.

भाऊसाहेब महाराजांच्या जयंतीनिमित्त सातारा, जावलीत भव्य भजन स्पर्धा

सातारा : सातारा तालुक्याचे भाग्यविधाते, माजी मंत्री स्व. श्रीमंत छ. अभयसिंहराजे भोसले उर्फ भाऊसाहेब महाराज यांच्या जयंतीनिमित्त सातारा आणि जावली येथे भव्य भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सातारा तालुक्यातील भजनी मंडळांसाठी शेंद्रे ता. सातारा येथील अजिंक्यतारा साखर कारखाना येथे दि. १५ मे रोजी तर, जावली तालुक्यातील भजनी मंडळांसाठी मंगलमूर्ती मंगल कार्यालय करंजे ता. जावली येथे दि. १७ मे रोजी हि स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षीस दिले जाणार असून स्पर्धेत विनामूल्य सहभाग घेता येणार आहे, अशी माहिती आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली आहे.

शेंद्रे येथे होणाऱ्या स्पर्धेत फक्त सातारा तालुक्यातील भजनी मंडळाना सहभागी होता येणार आहे. या स्पर्धेत प्रत्येक स्पर्धक संघात किमान ५ सदस्य असावेत, प्रत्येक संघाला १५ मिनिटे वेळ दिला जाईल, प्रत्येक संघाने २ अभंग व १ गाथ्यातील गौळण सादर करावी. संघ नोंदणी दि. १३ मे २०२४ रोजीच्या सायंकाळी ६ वाजेपर्यंत पर्यंत केली जाईल. स्पर्धेत महिला संघानाही प्रवेश दिला जाईल, एका स्पर्धकाला एकाच संघात सहभाग घेता येईल. सहभागी संघाला प्रत्येकी ५०० रुपये प्रवास भाडे दिले जाईल. स्पर्धा दि. १५ मे २०२४ रोजी सकाळी ८ वाजता सुरु होईल. बक्षीस समारंभ दि. १६ मे २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता स्पर्धेच्या ठिकाणी होईल. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाला २१,१११ रुपये, द्वितीय क्रमांक १५,१११ रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ११,१११ रुपये तसेच उत्तेजनार्थ ५,००० रुपये प्रत्येकी अशी दोन बक्षिसे दिली जाणार आहेत. याशिवाय उत्कृष्ट गायक २५०१ रुपये आणि उत्कृष्ट तबला वादक २५०१ रुपये बक्षीस दिले जाणार आहे. मंडळांच्या नाव नोंदणीसाठी संभाजी शेळके ९९२१४३०७६३, नागनाथ चव्हाण ९०७५७६०९९०, आप्पासो गायकवाड ९५४५५१०४६१ यांच्याशी संपर्क साधावा.

जावली तालुक्यातील स्पर्धेत एका मंडळात किमान ७ सदस्य असावेत, सदस्यांनी पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान करावेत, महिला भजनी मंडळांनाही सहभागी घेता येईल, मंडळाने आपली वाद्ये आणावीत, एक व्यक्ती एकाच मंडळात सहभाग घेऊ शकतो, संगीत शिक्षक व व्यावसायिक कलाकारांना सहभागी होता येणार नाही, अशी नियमावली असून जावलीतील स्पर्धा करंजे येथे दि. १७ मे रोजी सकाळी ८ वाजता सुरु होईल. स्पर्धकांनी आजपासून दि. १७ रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत नावनोंदणी करणे बंधनकारक आहे. दि. १७ रोजी सायंकाळी ६ वाजता बक्षीस वितरण समारंभ होणार असून या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाला २५,००० रुपये, द्वितीय क्रमांकाला १५,००० रुपये, तृतीय क्रमांकाला ११,००० रुपये, चतुर्थ क्रमांकाला ७,००० रुपये तर, पंचम क्रमांकाला ५,००० रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ट वादक २५०० रुपये आणि उत्कृष्ट गायक २५०० रुपये बक्षीस दिले जाणार आहे. मंडळांनी नाव नोंदणीसाठी प्रवीण महाराज शेलार ९३२५७८०८९७, विशाल रेळेकर ९४२१११८००४, दत्ता देशमुख ९४२३२६४३४५, अमरनाथ शिंदे ९६०४८०८९९१, विजय शेळके ९७६६८६३८७१ यांच्याशी संपर्क साधावा.

हॉटेलमालकाचा प्रामाणिकपणा; विसरलेली तीन लाखांची बॅग केली परत

वाई /प्रतिनिधी

वेळे (ता. वाई) येथे नितीनशेठ डेरे यांच्या वेळे येथील हॉटेल विशाल येथे सकाळी साडेदहा वाजता आंबा व्यापारी दिनेश देसाई पुण्यावरून रत्नागिरीला जात असताना नाश्त्यासाठी थांबले होते. नाश्ता झाल्यानंतर त्यांच्याजवळ तीन लाखांची रोख रक्कम असलेली बॅग ते येथेच विसरून गेले. कराड येथे पोहोचल्यावर त्यांच्या ही गोष्ट लक्षात आली. तेथून ते परत वेळे येथे विशाल हॉटेलमध्ये आले. अगोदरच नितीन डेरे यांनी ती बॅग सुरक्षित ठिकाणी ठेवली होती. देसाई आल्यानंतर त्यांची शहानिशा करून नितीन डेरे यांनी तीन लाखांची रोख रक्कम असलेली बॅग त्यांना परत केली. याबद्दल देसाई यांनी त्यांचे मन:पूर्वक आभार मानले आणि आजच्या युगात असेही प्रामाणिक लोक आहेत, याबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांनी रोख रक्कम बक्षीस देऊ केली; परंतु नितीनशेठ यांनी विनंतीपूर्वक नकार दिला.

नितीन डेरे यांच्या प्रामाणिकपणाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. नितीनशेठ डेरे हे आदर्श शिक्षक लक्ष्मण डेरे यांचे चिरंजीव तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवा नेते निलेश डेरे यांचे बंधू आहेत.

वाई बाजार समितीला १.३४ कोटी रुपयांचे विक्रमी उत्पन्न

वाई : वाई शेती उत्पन्न बाजार समिती सन २०२३-२४ मध्ये उत्पन्न १ कोटी ३४ लाख ४३ हजार चारशे रुपये इतके झाले असून वाढावा ५७ लाख ३९ हजार रुपये झाला असल्याची माहिती सभापती श्री मोहन जाधव यांनी पत्रकार परीक्षेत दिली.

आ. मकरंद आबा पाटील यांचे नेतृत्वाखाली बाजार समितीचा कारभार शिस्तबद्ध व सुनियोजित पद्धतीने चालू असून चालू वर्षी एक कोटी ३४ लाख ४३ हजार ४०० रुपये उत्पन्न झाले आहे वाढवा ५७ लाख ३९ हजार झाला असून तरतुदी १४ लाखाच्या केल्यानंतर निव्वळ वाढावा ४३ लाख ४१ हजार इतका झाला आहे .

आ. मकरंद पाटील व जिल्हा बँकेचे चेअरमन नितीन काका पाटील यांचे नेतृत्वाखाली बाजार समितीची निवडणूक होऊन सुमारे ९० टक्के मतदारांनी बाजार समितीची सत्ता पुन्हा आमदार पाटील यांच्या स्वाधीन केली.

मध्यंतरी प्रशासकीय कारर्कीर्दीचे कारभारामध्ये व भाजीपाला मंडईमध्ये विस्कळीतपणा आला होता.

नुतन संचालक मंडळाची सभेत आ.पाटील यांनी सभापतीपदी मोहन जाधव व उपसभापतीपदी विनायक येवले यांची एक मताने निवड केली. तद नंतर नविन पदाधिकारी यांनी सर्व संचालक व कर्मचारी यांना विश्वासात घेऊन वाई तालुक्यातील शेतकरी व कोकणातील व्यापाऱ्यांची तसेच हळद व्यापारी शेतकरी यांच्या स्वतंत्र मीटिंग घेऊन शेतकऱ्यांचे हिताचे व व्यापाऱ्यांच्या सोयीचे निर्णय घेतले. त्यामुळे बाजार समितीमधील आवक वाढून शेतकऱ्यांना चांगले व योग्य दर मिळाले. व्यापाऱ्यांचा व्यवसाय वाढून बाजार समितीस उत्पन्नही वाढले. त्यामुळेच चालू वर्षी ५७ लाखाच्या पुढे वाढावा मिळाला. चालू वर्षी बाजार समितीने अंतर्गत डांबरीकरण रस्ते, बंदिस्त गटर्स, पूर्वीचे बंद पडलेले स्वच्छतागृह सुस्थितीत आणले.शेतकरी हॉलमध्ये शेतकऱ्यांना उत्तम प्रकारच्या सुविधा दिल्या.

शेतकऱ्यांच्या हळद विक्रीसाठी व त्यांना उत्तम प्रकारचा दर मिळावा म्हणून बाहेरील व्यापाऱ्यांना प्राचारण करून नियमित लिलाव करून उच्चांकी दर मिळवुन देण्यासाठी प्रयत्न केला. त्यामुळे शेतकऱ्यांनी बाजार समितीमध्ये मोठ्या प्रमाणात हळदीची आवक झालेमुळे वाई बाजार समिती हळदीचे मोठे केंद्र बनले.

उपबाजार आवार पाचवड येथे जनावरांचा बाजार दर मंगळवारी मोठ्या प्रमाणात भरतो. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या जनावरांना योग्य दर मिळाले तर खरेदीदारास चांगली जनावरे मिळाली .तसेच उपबाजार पाचवड येथे सेल हॉल व वेअर हाऊस बांधण्याचा मानस असल्याचे सभापती जाधव यांनी सांगितले.

तसेच वेलंग येथे चालू वर्षी जनावरांचा वार्षिक बाजार कोरोनामुळे व लंपी आजारामुळे विस्कळीत झालेला होता तो वार्षिक बाजार ह्या वर्षी मोठ्या प्रमाणात भरवण्यात आला.

सन २००८ पूर्वी बाजार समितीचे अवस्था पूर्णपणे बिकट झाली होती. कर्मचाऱ्यांचे पगारही वेळेत मिळत नव्हते. बाजार समिती कर्जबाजारी झाली होती. बाजार समितीमध्ये शेतकरी व व्यापाऱ्यांना सुविधा दिल्या जात नव्हत्या. तदनंतर सत्तांतर होऊन आ. पाटील यांचेकडे बाजार समिती आली. श्री मोहन जाधव यांच्याकडे सभापती पदाची धुरा व उपसभापती रवींद्र जाधव त्यावेळीचे सर्व संचालक मंडळ यांनी अथक परिश्रम घेऊन बाजार समिती सुस्थितीत आणली.

यापुढे आम्ही सर्व संचालक मंडळ कर्मचारी मिळून बाजार समितीचा कारभार लोकाभिमुख करण्याचा मनोदय असल्याचे सभापती श्री मोहन जाधव यांनी सांगितले.

पान १ वरून

मावळातील तळेगावात चोरट्यांकडून भरदिवसा गोळीबार

नाहीत. त्यांचा घरफोडीच कट उधळला गेला.

नागरिक आपल्याला पकडून मारतील या भीतीने त्यांनी हवेत गोळीबार केला. त्यानंतर चोरटे पळून गेले आहेत. घटनेची माहिती मिळताच तळेगाव दाभाडे पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू असून.याप्रकरणी पुढील तपास तळेगाव दाभाडे पोलीस करीत आहेत.

जातीपातीच्या राजकारणाला बळी न पडता विकासाची कास धरा...

जातीपातीचे राजकारण केलेले दिसून आले नाही, असे ठाकरे म्हणाले.

राम मंदिराची उभारणी केवळ मोदींमुळेच

अयोध्येत बाबरी मशिदीचे पतन झाल्यानंतर त्या ठिकाणी कधी राम मंदिराची उभारणी केली जाईल, असे आपल्याला वाटत नव्हते. केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळेच अयोध्येत राम मंदिराची उभारणी होऊ शकली, असे ठाकरे यांनी नमूद केले. काही बाबतीत आपले मोदी यांच्याशी मतभेद होते. यापुढेही राहतील. मात्र, त्यांनी केलेल्या चांगल्या कामाचे कौतुक करण्यासही आपण मागे पडणार नाही, असेही ते म्हणाले.

पुणे लोकसभा मतदारसंघात १४ लाख मतदार ओळख चिठ्ठ्यांचे वितरण

कर्वे नगर, खोली क्र.१, पर्वती मतदार संघातील मतदान केंद्र क्रमांक ६८, मनपा शाळा क्र.८०/बी सरिता नगरी, पुणे कॅन्टोन्मेंट मतदार संघातील मतदान केंद्र क्रमांक १४०, महात्मा जोतिबा फुले गर्ल्स स्कूल, नाना पेठ, कसबा पेठ मतदार संघातील मतदान केंद्र क्रमांक ८७, धर्मवीर संभाजी प्राथमिक विद्या मंदिर, शाळा क्र. १७/४९, तळमजला खोली क्र.२, शास्त्री रोड, नवी पेठ हे मतदान केंद्र महिला संचलित मतदान केंद्र असणार आहेत.

भाजप व प्रशासनने क्रीडा क्षेत्राकडे दुर्लक्ष केले

असा कायदा केंद्र सरकारने केला. खेळाडुं घडवण्याचे काम करणे त्यांनी थांबवले . खेळाडूला अधिक सुविधा कशा देता येतील,खेळाचे आयोजन-प्रशासनने केले पाहिजे . खेळांमध्ये प्रशासनाने राजकारण आणू नका.

पुणे महापालिका क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन देणारी म्हणून नावलौकिक आहे. येथे मैदाने आहेत,पण ते वापरु शकत नाही. त्यासाठी नियम व अटी ठेवल्या आहेत मग त्याचा उपयोग काय?असा सवाल यावेळी पवार यांनी उपस्थित केला. पुण्यात खेळाडूंना न्याय भेटत नसेल तर आपल्याला त्यांचा नक्कीच विचार करावा लागणार आहे.

पंजाब आणि हरियाणा मध्ये खेळाडूंना मिळणाऱ्या सुविधा आपल्या राज्यात देखील मिळाल्या पाहिजेत. खेळाडूंच्या समस्या सोडवण्यासाठी राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्राकडून काही मार्गदर्शक सूचना द्यावा लागतील. सरकार कुणाचेही येऊ द्या,खेळाडूंना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

खेळाडूंना खर्च खुप व मेहनत खुप करावी लागते. त्यांना प्रशासन व केंद्र व राज्य सरकारने न्याय दिला पाहिजे,असेही यावेळी पवार यांनी सांगितले.

रवींद्र धंगेकर म्हणाले,शरद पवार यांचे क्रीडाक्षेत्रात मोठे योगदान आहे. त्यांच्यासारखा वस्ताद प्रश्न सोडवणारा व मार्गदर्शन करणारा आमच्याकडे आहे. राज्याचे क्रीडा वैभव पुन्हा प्राप्त करून देणार आहे. पुण्यातील क्रीडा क्षेत्र व खेळाडूंना न्याय मिळवून देण्यासाठी काम करणार आहे. पुण्यात क्रीडा प्रश्नांवर काम केले आहे.

सुनील केदार म्हणाले,पुण्यात आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ होण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. आमचे सरकार गेल्यामुळे ते काम थांबले. आता नागरिकांनी क्रीडा व खेळाडूंच्या बाजू मांडल्या पाहिजे. आपली भावी पिढी त्यातून घडणार आहे.

सतीश देसाई म्हणाले,बालेवाडी स्टेडियम मध्ये खेळाडूंना खेळाडूंना चांगली वागणूक मिळत नाही. सणस मैदानावरील वसतिगृहात खेळाडूंना मिळत नाही. त्यांना पूर्वीसारखे प्रोत्साहन मिळत नाही.

शकुंतला खटावकर म्हणाल्या,महिलांना संधी कमी दिली जाते. राज्यात ठिकठिकाणी स्वतंत्र अकॅडमी स्थापन केली पाहिजे. आदिवासी भागात प्रशिक्षण नसल्याने राज्यभरात क्रीडा अकॅडमी सुरू करणे गरजेचे आहे,त्यानंतर आपल्याला ऑलम्पिक खेळाडू मिळतील.

रोहन मोरे म्हणाले,गेल्या दहा वर्षात खेळाडूंनी खूप सहन केले आहे. बालेवाडी हक्काने वापरायला मिळत होते,पण१०वर्षात बदल झाला आहे. आता बालेवाडीत पाहिले पैसे भरावे लागतात. उच्च दर्जाची पायाभूत सुविधा आहे,पण ते वापरता येत नाही. पुण्याच्या अवतीभवती क्रीडांगणे केली पण त्याची सध्या दुर्दशा झाली आहे. खेळाडूंवर प्रेम होते पहिले आता ते दिसत नाही.

कुस्तीपटू म्हणाला,आम्हाला जास्त काही पाहिजे नसतं,एक मैदान पाहिजे आणि एक वस्ताद पाहिजे तुमच्या सारखा. या वाक्यावर खेळाडूंनी टाळ्या वाजवून दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एँड अभय छाजेड यांनी केले. अरविंद शिंदे यांनी मानले.

शरद पवार यांनी नाकारली सोबत येण्याची 'ऑफर'

महात्मा गांधी पंडित नेहरू यांची विचारधारा सर्वसमावेशक आहे. ती कोणत्याही विशिष्ट समाजाला दूर ठेवणारी नाही. सध्या प्रत्येक भाषणात मोदी मुस्लिम समाजाबद्दल वेगळी विधाने करीत आहेत. यामुळे समाजात अविश्वास निर्माण होऊन दरी आणि तेढ निर्माण होऊ शकते. देशांच्या दृष्टीने हे योग्य नाही. भारताला पुढे जायचे असेल तर हिंदू मुस्लिम ईसाई अशा सगळ्या समाजांनी एकत्र राहणे आवश्यक आहे, असेही पवार यांनी स्पष्ट केले.

मोदी यांनी घेतलेल्या काही निर्णयामुळे जनमत त्यांच्यापासून दूर जात असल्याचे त्यांना जाणवू लागले असावे. त्यामुळेच ते समाजाचे ध्रुवीकरण करणारी विधाने करीत आहेत. ही विधाने संभ्रम निर्माण करणारी आहे, अशी टीकाही पवार यांनी केली.

शिवरे येथे डंपर अंगावरून गेल्याने महिला जागीच ठार

माहितीनुसार, सांगली येथील महेश साठे व त्यांची पत्नी सोनाली साठे हे दांपत्य होंडा कंपनीच्या ॲक्टीवा (एम एच - १०, डी यू ७५५९) या दुचाकीवरून पुण्याहून साताऱ्याच्या दिशेने जात होते. यावेळी शिवरे गावच्या हद्दीत आले असता हॉटेल तृप्ती समोर भरधाव वेगाने जाणाऱ्या डंपर ने पाठीमागून जोरदार धडक दिली. यादरम्यान महेश साठे यांचे नियंत्रण सुटल्यामुळे दुचाकी रस्त्यावर आदळली. यावेळी दुचाकीवर मागे बसलेल्या सोनाली साठे या रस्त्यावर पडल्या. यादरम्यान डंपर या महिलेच्या अंगावरून गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. सदर महिलेला शवच्छिदनासाठी भोर येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालय येथे नेले असून पुढील तपास राजगड पोलीस करीत आहेत.

राजेवाडी येथे चारचाकी वाहनावर वडाचे झाड कोसळले

पालापाचोळा रस्त्याच्या शेजारील बांधावर एकत्र जमा करून पेटवत असतात.संबंधित शेतकरी पालापाचोळा पेटवून घराकडे गेल्यानंतर रात्रीचे वेळी पेट घेतलेल्या छोट्या लाकडाच्या काटक्यामुळे मोठ्या झाडाच्या खालील बाजूस आग लागते. त्यामुळे झाडे कमकुवत होऊन एक ते दोन दिवसात जोरदार वारा आल्यास रस्त्यावर पडतात.

अशा प्रकारे रस्त्यालगतची बरीच झाडे भुद्याला जळाली असून वाहनचालकांनसह प्रवाशांना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागतो आहे. तर मोठ मोठी झाडे अशा प्रकारे नष्ट होत असून निसर्गाचा ऱ्हास होत असल्याने व वन विभागाच्या दुर्लक्षितपना मुळे निसर्गप्रेमी कडून याचा तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मनी लॉंड्रिंगची भीती दाखवत ८२ लाखांचा ऑनलाईन गंडा

वॉरंट पाठविले. अटक टाळायची असल्यास तातडीने पैसे जमा करावे लागतील, असे सांगण्यात आले.

त्यानंतर चोरट्यांनी त्यांना बँक खात्यात पैसे पाठविण्यास सांगितले. चोरट्यांनी तक्रारदाराकडून वेळोवेळी ८२ लाख २८ हजार रुपये उकळले. फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर तक्रारदाराने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलीस निरीक्षक एस जगदाळे तपास करत आहेत.

शहरात गेल्या काही महिन्यांपासून केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय), अमली पदार्थ विरोधी विभागाकडून (नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो) कारवाई करण्यात येणार असल्याची भीती दाखवून फसवणूक करण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत.

वेशांतर करून लूटमार करणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद

सातारा : वेगवेगळ्या जिल्ह्यात वेशांतर करून घरफोडी करणाऱ्या दोन अट्टल गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून पाच घरफोडयांमधील ३५ तोळे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. बाजारभावाप्रमाणे त्याची किंमत २४ लाख ५० हजार रुपये इतकी आहे या कारवाईची माहिती पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राहुल हिरामण लष्करे, राहणार काळा खडक वाकड तालुका मुळशी जिल्हा पुणे व अजय एकनाथ चव्हाण गहुंजे तालुका मुळशी जिल्हा पुणे अशी आरोपींची नावे आहेत. या दोघांवर सातारा जिल्ह्यात सातारा शहर, कराड शहर, सातारा शहर, खंडाळा असे एकूण पाच गुन्हे दाखल आहेत या दोघांनी १३ मार्च २०२४ रोजी साताऱ्यात २५ फेब्रुवारी २०२४ रोजी गोटे तालुका कराड तसेच फलटण येथे घरफोडीचे गुन्हे केले होते. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांनी खेड तालुका सातारा येथे केलेल्या चोरी प्रकरणी सुनील उर्फ सुशील बाबन भोसले याला अटक केली. चोरीस गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांपैकी २६ ग्रॅम सोन्याचे दागिने यापूर्वी हस्तगत करण्यात आले होते या गुन्ह्यात आणखी एकाचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे आणि त्यांच्या तपास पथकाने ताब्यात घेऊन त्याच्याकडून २५ तोळे दागिन्यांचा १७ लाख पन्नास रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अभिलेखा वरील गुन्हेगार लष्करे व चव्हाण या दोघांनी इतर तीन गुन्ह्यांमध्ये चोरीस गेलेल्या सोन्याच्या दागिन पैकी सात लाख रुपये किमतीचे दहा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आलेले आहेत नमूद आरोपीच्यांकडून एकूण पाच घरफोडीचे गुन्हे उघड करून ३५ तोळे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

राष्ट्रपतींच्या हस्ते गोव्यातील संजय अनंत पाटील यांचा कृषी क्षेत्रातील योगदानासाठी नागरी अलंकरण समारंभात पद्मश्री पुरस्काराने गौरव

पणजी : नवी दिल्ली येथे आज आयोजित करण्यात आलेल्या नागरी अलंकरण सोहोळ्यामध्ये, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते, गोव्यातील संजय अनंत पाटील यांचा कृषी क्षेत्रातील योगदानासाठी पद्म श्री पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

पद्मश्री प्राप्त संजय अनंत पाटील यांचे जीवन आणि कार्य यांच्याविषयी थोडक्यात माहिती -

(पद्मश्री)संजय अनंत पाटील स्थानिक परिसरात संजय काका म्हणून प्रसिद्ध असलेले संजय अनंत पाटील हे कल्पक शेतकरी आणि हरित क्रांतीचे पुरस्कर्ते आहेत. अनेक जण त्यांना 'वन मॅन आर्मी'म्हणूनही ओळखतात कारण त्यांनी एकट्याने दहा एकर ओसाड जमिनीवर नैसर्गिक शेती तसेच शून्य उर्जा वापरासह सूक्ष्म सिंचन पद्धतीचा संपूर्ण स्वीकार ी १९९१ पासूनच जीवामृताच्या वापरासह नैसर्गिक शेती करायला सुरुवात केली. एकाच देशी वाणातील गाईचे शेण आणि गोमुत्र यांचा उपयोग कन ते दर महिन्याला ५००० लिटर जीवामृताचे उत्पादन करतात. रासायनिक खते आणि कीटकनाशके यांचा एक ग्राम देखील न वापरता केवळ एक देशी गाय, दहा एकर शेतीसाठी पुरेशी आहे हे त्यांनी स्वत:च्या पद्धतीतून दाखवून दिले आहे.जीवामृताचा उत्पादनाचा वेग वाढवून उत्पादन सुधारण्यासाठी त्यांनी स्वयंचलित जीवामृत उत्पादन संयंत्रांची रचना तसेच उभारणी केली. नैसर्गिक शेती प्रक्रियेचा स्वीकार केल्यानंतर त्यांचा उत्पादन खर्च ६० ते ७० टक्क्यांनी कमी झाला तसेच त्यांच्या पिकाचे उत्पादन २५ ते ३० टक्क्यांनी वाढले आणि ३ लाखांची बचतही झाली.

३.संजय पाटील यांच्या शेतात असलेल्या टेकडीवर त्यांनी स्वत: एकट्याने सव्वाशे फुटाचा बोगदा (सुरंग) खणला आणि पावसाळ्यानंतरच्या काळात जाणवणारी पाणीटंचाईची मोठी समस्या सोडवली. त्याशिवाय त्यांनी पावसाचे पाणी गोळा करण्यासाठी त्यांच्या शेताच्या सभोवताली असलेल्या टेकड्यांवर पाझर खंदक खणले. पाटील यांनी राबवलेल्या शून्य वीज, सूक्ष्म सिंचन आणि पर्जन्य जल संवर्धन पद्धतीच्या माध्यमातून एक वर्षभरात १५ लाख लिटर पाणी मिळेल अशी खात्रीशीर व्यवस्था निर्माण केली आहे.

४.पाटील यांनी फक्त ११ वी पर्यंतचे औपचारिक शिक्षण घेतले असले तरीही जल संवर्धन आणि नैसर्गिक कृषी पद्धतींच्या बाबतीत त्यांच्याकडे एखाद्या अभियंत्याला शोभेलसे ज्ञान आणि कौशल्य आहे. ते केवळ अभिनव संशोधकच नाहीत तर गोवा येथील भारतीय कृषी संशोधन मंडळ-केंद्रीय तटवर्ती कृषी संशोधन संस्था तसेच स्थानिक कृषी विज्ञान केंद्राच्या तंत्रज्ञानांचा त्वरित स्वीकार करणारे शेतकरी आहेत. संजय पाटील आदर्श शेतकरी असून त्यांचे शेत आवर्जून बघण्यासारखे आहे. दरवर्षी ३०० ते ५०० लोक त्यांच्या शेताला भेट देऊन तेथील नाविन्यपूर्ण यंत्रणा पाहतात. पाटील यांच्या या यशोगाथेने त्यांच्या सोबतच्या अनेक शेतकऱ्यांना खास करून तरुणांना कृषी क्षेत्राकडे आकर्षित करण्यासाठी प्रेरणा देत आहे. ५.पाटील यांना गोवा राज्य सरकारकडून कृषिरत्न -२०१४ हा पुरस्कार मिळाला असून त्यांना आयएआरआय- कल्पक शेतकरी-२०२३ या पुरस्काराने देखील गौरवण्यात आले आहे.

२३ देशातील ७५ प्रतिनिधींनी आंतरराष्ट्रीय निवडणूक अभ्यागत कार्यक्रमाचा भाग म्हणून ६ राज्यांमधल्या मतदान प्रक्रियेची केली पाहणी

नवी दिल्ली : २०२४च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मतदान प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींनी अतिशय आनंद व्यक्त केला आहे. काही प्रतिनिधींनी या प्रक्रियेतील पारदर्शकतेची प्रशंसा केली तर इतरांनी भारतीय निवडणूक आयोगाच्या हरित मतदान केंद्रासारख्या उपक्रमांना प्रेरणादायी म्हटले आहे. ईव्हीएम-व्हीव्हीपॅट यांचे रॅन्डम ायजेशनसह या निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाच्या वापराची देखील या प्रतिनिधींनी प्रशंसा केली.लोकशाही सिद्धांतांना बळकट करण्यासाठी भारतीय मतदारांचा अढळ विश्वास आणि बांधिलकी यामुळे विशेषत्वाने प्रभावित झाल्याचे देखील काही प्रतिनिधींनी सांगितले.एकंदरितच या देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांच्या प्रतिनिधींमध्ये याबाबत एकमत झाले की भारतातील निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, समावेशक आणि सर्वांच्या आवाक्यातील आहे आणि एखाद्या उत्सवाच्या भावनेने आयोजित केली जाते.

या प्रतिक्रिया आंतरराष्ट्रीय निवडणूक अभ्यागत कार्यक्रम ांतर्गत आतापर्यंतच्या सर्वात म ोठ्या आंतरराष्ट्रीय शिष्टमंडळाने भारताच्या सार्वत्रिक निवडणुकांम ध्ये नुकत्याच संपलेल्या तिसऱ्या टप्प्याची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर व्यक्त केला.

तिसऱ्या टप्प्यात ११ राज्ये केंद्रशासित प्रदेशातील ९३ मतदारसंघांमध्ये मतदान झाले आणि या प्रतिनिधींनी ६ राज्येकेंद्रशासित प्रदेशांमध्ये मनुष्यबळ आणि यंत्रांची ने-आण करण्याच्या निर्विवादपणे जगामध्ये अतिशय गुंतागुंतीच्या आणि व्यापक असलेल्या मतदानाच्या तयारी प्रक्रियेसह मतदान प्रक्रियेची पाहणी केली.

आयईव्हीपी २०२४ चा प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळावरील अनुभव

महाराष्ट्र

बांगलादेश, श्रीलंका, कझाकस्तान आणि झिम्बाब्वेच्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांच्या प्रतिनिधींनी महाराष्ट्रातील रायगड लोकसभा मतदारसंघाला भेट दिली आणि निवडणुकीपूर्वीची व्यवस्था, मतदान प्रक्रियेतील कर्मचारीवर्गाची तैनाती आणि इतर लॉजिस्टिक्स प्रक्रिया पाहिली. या गटाने जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक अधिकारी, पीठासीन अधिकारी आणि निवडणुकीशी संबंधित इतर अधिकाऱ्यांशी भारतीय निवडणुकांच्या विविध पैलूंबाबत संवाद साधला. मतदान केंद्राम धील मधील पारदर्शकतेच्या उपाययोजनांमुळे प्रतिनिधी प्रभावित झाले.

पार्श्वभूमी

या २३ देशांचे प्रतिनिधी, विशेषत: ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, भूतान, कंबोडिया, चिली, फिजी, जॉर्जिया, कझाकस्तान, किर्गिझ, मादागास्कर, मालदीव, मंगोलिया, मोल्डोवा, नामिबिया, नेपाळ, न्यू गिनी, फिलीपिन्स, रशिया, सेशेल्स, श्रीलंका, ट्युनिशिया, उझबेकिस्तान, झिम्बाब्वे या देशांचे प्रतिनिधी ५ मे २०२४ रोजी भारतामधील सार्वत्रिक निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया पाहण्यासाठी नवी दिल्लीत दाखल झाले होते.

फटाका फॅक्ट्रीत भीषण स्फोट, ८ जणांचा मृत्यू

शिवकाशी : तामिळनाडूच्या शिवकाशीमध्ये गुरूवारी फटाका फॅक्ट्रीमध्ये भीषण स्पोट झाला आहे, यात ५ महिलांसह ८ म जुरांचा मृत्यू झाला आहे, तर इतर तीन जण जखमी झाले आहेत. भारताचं फटाका केंद्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या शिवकाशी शहरात ही दुर्घटना घडली आहे. विरुधनगर जिल्ह्यातल्या शिवकाशीजवळ सेंगामालापट्टीम धल्या एका फटाका फॅक्ट्रीमध्ये या स्फोटानंतर आग लागली. याची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि ऍम्ब्युलन्स तातडीने घटनास्थळावर पोहोचलं. या दुर्घटनेत जखमी झालेल्या व्यक्तींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. जखमी झालेल्यांमध्ये एकाची प्रकृती चिंताजनक आहे. आग लागण्याचे कारण अजून स्पष्ट झालेलं नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टालिन यांनी या घटनेबाबत दु:ख व्यक्त करत जखमींना योग्य उपचार दिले जावेत, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या स्फोटानंतर फॅक्ट्रीच्या ७ खोल्यांमध्ये ठेवलेले फटाके जळून खाक झाले आहेत. या फटाका फॅक्ट्रीकडे लायसन्स असल्याची माहितीही समोर येत आहे. निवडणूक आयोगाकडून परवानगी मिळाल्यानंतर मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांना मदत केली जाईल, असं मुख्यमंत्री स्टालिन यांनी सांगितलं आहे. लोकसभा निवडणुकीमुळे ४ जूनपर्यंत आचारसंहिता लागू आहे.

फॅक्ट्रीमध्ये स्फोट झाला तेव्हा तिथे १० कर्मचारी उपस्थित होते. याआधी फेब्रुवारी महिन्यात विरुधनगर जिल्ह्यात एका फटाका फॅक्ट्रीमध्ये झालेल्या स्फोटात ४ महिलांसह १० लोकांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शोक व्यक्त करत मृतकांच्या कुटुंबाला पीएमएनआरएफच्या माध्यमातून २ लाख रुपयांची मदत जाहीर केली होती.

'कलम ३७० काढलेलेच नाही, अदानींनी लिथियमसाठी जमिनी खरेदी केल्या'

श्रीरामपूर : ''अमित शाह म्हणतात आम्ही कलम ३७० रद्द केलं, त्याच्याबद्दल उद्धव ठाकरेंनी बोलावे. आम्ही तुम्हाला ३७० कलम रद्द करायला, जाहीर पाठिंबा दिला. पण पर्वा असीम सरोदे जे बोलले ते धक्कादायक आहे. असीम सरोदेंनी जी माहिती दिली ती धक्कादायक आहे. ते म्हणाले मोदी सरकारने कलम ३७० काढलेलंच नाही, त्यातील '३७० ब' हा कॉलम आहे, त्याला यांना स्थगिती दिली आहे. त्या स्थगितीचा अर्थ काय? काश्मीरमध्ये बाहेरची माणसं जमिन घेऊ शकत नव्हते. ते आता जमिन घेऊ शकतात. त्या कायद्यानंतर सर्वात जास्त जमिन कोणी खरेदी केली? अदाणी यांनी केली. काल मोदी बोलले टेम्पो भरुन पैसे दिले. त्या अदाणींनी जमिन खरेदी केली, असं सरोदे म्हणाले'' असे खळबळजनक आरोप ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मोदी सरकारवर

केले आहेत. शिर्डी लोकसभा मतदार संघातील श्रीरामपूर येथे ठाकरेंची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी ठाकरेंनी मोदी सरकारवर कडाडून हल्लाबोल केला.

अदानींना लिथियम मिळावे, यासाठी कलम ३७० रद्द केले

उद्धव ठाकरे म्हणाले, आपल्या मोबाईलमध्ये बॅट्रीज येतात, त्यानंतर आता वाहने येणार आहेत. त्याच्यासाठी लागणाऱ्या बॅट्री आहेत. त्या बॅट्रीला लागणारे लिथियम तिथे मिळतं. ते अदाणींना मिळावे, यासाठी कलम ३७० रद्द केलं. आम्हाला वाटलं मोठं काम केलं. आम्ही देखील भाबडेपणाने पाठिंबा दिला. काल मोदी बोलले टेम्पो भरुन पैसे दिले. त्या अदाणींनी जमिन खरेदी केली, असा आरोपही ठाकरेंनी केला.

कोणीही यायचे मराठी माणसाला बदनाम करायचे

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रातील उद्योग सगळे गुजरातमध्ये नेत आहेत. एका बिल्डरने मुंबईत सांगितले की, मुंबईत मराठी माणसाला घर देत नाही. आमच्या राज्यात तुम्ही आम्हाला बेघर करण्याची हिंमत दाखवा. तुमची दुकाने बंद केल्याशिवाय आम्ही तुम्हाला सोडणार नाही. इतर राज्यांमध्ये माझी मराठी माणसे राहत नाहीत? पण कोठेही मराठी माणसं यांच्यासारखी मस्ती करताना दिसणार नाहीत. कोणीही यायचे मराठी माणसाला बदनाम करायचे, असे यांचे सुरु आहे. भ्रष्टाचाराचे आरोप करायचे. कुटुंब नासवायची. महाराष्ट्राला बदनाम करतात. गुजरातला उद्योग धंदे नेण्यासाठी महाराष्ट्राला बदनाम केले जात आहे.

पाकव्याप्त काश्मीरदेखील परत आणणार : एस जयशंकर

नवी दिल्ली : '३७० कलम हटवले, पाकव्याप्त काश्मीरदेखील परत आणणार'अशी ग्वाही परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी दिल्ली विद्यापीठाच्या गार्गी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना संबोधित करताना दिली.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशभरात पाकिस्तानचा मुद्दा देखील मोठ्या प्रमाणात गाजत आहे. यावेळी त्यांनी पाकव्याप्त काश्मिरसंदर्भात पाकिस्तानला कडक इशारा दिला. पीओके भारतात परत आणण्यासाठी मोदी सरकार कटिबद्ध आहे. पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा भाग असून तो भारतात परत आला पाहिजे. यावर संसदेचा प्रस्ताव आहे आणि सर्व राजकीय पक्ष यासाठी वचनबद्ध आहेत, असे एस जयशंकर म्हणाले.

''लोकांनी हे मान्यच केले होते की कलम ३७० बदलता येणार नाही आणि हे स्वीकारले होते. पण एकदा आपण ते बदलले की संपूर्ण वास्तविकता बदलली. पाकव्याप्त काश्मीरबाबत संसदेत प्रस्ताव आहे. मला एक गोष्ट नक्कीच सांगायची आहे, ती म्हणजे १० वर्षापूर्वी किंवा ५ वर्षापूर्वीही लोक आम्हाला या बाबतीत विचारत नव्हते. पण जेव्हा आम्ही ३७० रद्द केले, आता लोकांना समजले आहे की पाकव्याप्त काश्मीर देखील महत्त्वाचे आहे,'' असे जयशंकर यांनी सांगितले.

त्याआधी रविवारी परराष्ट्र मंत्र्यांनी पाकव्याप्त काश्मीर कधीही भारताबाहेर जाणार नसल्याचे जाहीर केले होते.ओडिशातील एका कार्यक्रमात बोलताना जयशंकर म्हणाले होते,''पाकव्याप्त काश्मीर या देशाच्या बाहेर कधीच नव्हते. तो या देशाचा एक भाग आहे.पाकव्याप्त काश्मीर पूर्णपणे भारताचा भाग असल्याचा संसदेचा ठराव आहे. देशात बदल झाला आहे. गेल्या दहा वर्षात देशाचा स्वत:बद्दलचा विचार बदलला आहे. आमचा दृष्टिकोन जगासमोर ठेवायला आम्ही आता घाबरत नाही. देशाच्या प्रत्येक भागात असलेले वातावरण पाहता एक प्रकारे आपण काळासोबत वाटचाल करत आहोत. भाजपची विचारधारा राष्ट्रवादी आहे. आपण काश्मीर,चीन,अण्वस्त्रे किंवा इतर देशांबद्दल बोललो. आपली मते मांडताना आपण मागेपुढे पाहत नाही, हे भाजपच्या मनात आहे,'' असेही एस जयशंकर यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्राच्या राजकारणात पहिल्यांदाच; मोदी-राज एकत्र

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकाच व्यासपीठावर येणार आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात पहिल्यांदाच या दोन नेत्यांची तोफ एकत्र धडधडणार आहे. येत्या १७ मे रोजी महायुतीची जाहीर सभा छत्रपती शिवाजी पार्क मैदानात होणार आहे. या ऐतिहासिक सभेचा टीझर लॉन्च करण्यात आला आहे.

महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिल्यानंतर याच सभेत पहिल्यांदाच मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी एकाच व्यासपीठावर उपस्थित राहतील. या सभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज ठाकरे यांच्याशिवाय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या काही दिवस आधी राज ठाकरे यांनी दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. यानंतर गुढी पाडवा मेळाव्यात राज ठाकरेंनी पंतप्रधान मोदींना बिनशर्त पाठिंबा देत असल्याचं जाहीर केलं. राज ठाकरेंनी रत्नागिरी-सिंधुदुर्गचे भाजप उमेदवार नारायण राणे यांच्या प्रचारासाठी सभाही घेतली होती.

मी मॅच फिक्सिंग करत नाही, बारणेंसाठी अजित पवारांची बॅटींग

पुणे : राज्यातील महायुती व महाविकास आघाडीत तीन पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढवत आहेत. मात्र, स्थानिक पातळीवर एकमेकांविरुद्ध लढणाऱ्या नेत्यांनाही युती किंवा आघाडी धर्म पाळायचा, वरिष्ठांचा आदेश पाळायचा म्हणून जुळवून घ्यावे लागत आहे. त्यामुळे, बड्या नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली असून नेतेमंडळी स्थानिक नेत्यांना कधी प्रेमाने तर कधी इशारा देऊन महायुती व आघाडी धर्म पाळण्याचे सांगत आहेत. अजित पवार यांनी आज शिरुर मतदारसंघात आढळराव पाटील यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. या सभेतून अजित पवारांनी आमदार अशोक पवार यांना सज्जड दम भरला होता. आता, मावळ मतदारसंघातही अजित पवारांनी उमेदवार श्रीरंग बारणेंसाठी फुल्ल बॅटींग करता, राष्ट्रवादीच्या स्थानिक कार्यकर्त्यांना गर्भित इशाराच दिला आहे.

उबाठाचे २०१९ मध्ये काँग्रेसीकरण झाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची टीका

ठाणे : उबाठा आधीच लीन होती, आता ती कधीही विलीन होऊ शकते, असे शरद पवार यांचे म्हणणे आहे. परंतु २०१९ मध्येच उबाठाचे काँग्रेसीकरण झाले आहे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केली. प्रादेशिक पक्षाने काँग्रेसमध्ये विलीन झाले पाहिजे, असे शरद पवार म्हणतात. म्हणजेच त्यांनी हार मानली आहे का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील २७ गाव संघर्ष समितीचे पदाधिकारी गुलाब वझे, दत्ता वझे आणि कार्यकर्त्यांनी गुरुवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. या पक्ष

प्रवेशानंतर बोलताना त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टिका केली. २७ गाव संघर्ष समिती ही न्यायहक्कासाठी संघर्ष करणारी ही समिती आहे. या समितीच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत पक्षप्रवेश केला आहे. कल्याण लोकसभा मतदार संघाम धील विविध पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते दररोज शिवसेनेत दाखल होत आहेत. खासदार शिंदे यांनी केलेल्या कामावर विश्वास ठेवून अनेकजण पक्षात येत आहे. ताकदीचे कार्यकर्ते पक्षात येत असल्याने आमचा पक्ष मजबूत होत आहे, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

प्रादेशिक पक्षाने काँग्रेसमध्ये विलीन झाले पाहिजे, असे शरद पवार म्हणतात. म्हणजेच त्यांनी हार मानली आहे का, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. उबाठा आधीच लीन होती, आता ती कधीही विलीन होऊ शकते, असे शरद पवार यांचे म्हणणे आहे. परंतु २०१९ मध्येच उबाठाचे काँग्रेसीकरण झाले आहे, अशी टीका करत त्यांना त्यांचा पराभव दिसू लागल्याचा दावाही त्यांनी केला. घोडा मैदान लांब नाही. चार तारखेला मतमोजणी आहे. आतापर्यंत तीन टप्प्यात मतदान झाले असून त्यात महायुती आघाडीवर आहे, असा दावाही त्यांनी केला. महायुती सरकारने गेल्या दोन वर्षात केलेले काम आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात केलेले काम याची पोचपावती देशासह राज्यातील जनता देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा महायुतीचा घटक पक्ष आहे. यामुळे महायुतीची सभा शिवाजी पार्कवरच होईल. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा रोड शो होणार आहे. पंतप्रधान मोदी हे जिथे जातात, तिथे माणसांची मोठी गर्दी होते. त्यांच्या स्वागतासाठी मुंबई आणि महायुतीचे सर्व पदाधिकारी तयार आहेत, असेही ते म्हणाले.

दूरसंचार विभागाने १५ स्टार्टअप्स, शिक्षणसंस्थांना एकत्र आणले

बँगलोर : एका स्तुत्य उपक्रमांतर्गत दूरसंचार विभागाने '' टेलिकॉम डिझाईन कोलॅबरेशन स्प्रिंट'' या विषयावर आयोजित केलेल्या उपक्रमात स्टार्ट अप्सएमएसएमई, शैक्षणिक संस्था आणि संशोधन संस्थांना एकत्र आणले.दूरसंचार विभागाने आयआयआयटी बँगलोर येथे या स्प्रिंटचे आयोजन केले होते. यामध्ये रेडियो ऍक्सेस नेटवर्क(ींअ-)मधल्या १५ आघाडीचे स्टार्ट अप्स एमएसएमई, प्रमुख परिसंस्था, आयआयटी मद्रास, सी-डॉट, आयआयटी दिल्ली यांसारख्या प्रतिष्ठेच्या संस्था आणि इतर नेटवर्क कंपन्या सहभागी झाल्या होत्या.

सर्वसमावेशक ५उ सोल्युशनसह सर्वसमावेशक आणि भविष्यसज्ज दूरसंचार स्टॅक विकसित करण्यासाठी आणि भविष्यातील ६उ पर्यंतच्या प्रगतीसाठी एक मंच तयार करण्यासाठी डीप टेक रॅपिड आयडिएशन आणि नाविन्यपूर्ण उपायांमध्ये हे सहकार्य प्रस्थापित आहे.

सामुहिक शक्तीचा लाभ घेणे,समावेशक उपायांना प्रोत्साहन देणे आणि बाजारपेठेत संधी निर्माण करणे ही या स्प्रिंटची तीन प्रमुख उद्दिष्टे आहेत.

गाझात पिण्याच्या पाण्याचे साठे आणि सांडपाण्याच्या सुविधांवर हल्ले

राजदंड न्युज नेटवर्क : इस्रायलनं हमासच्या विरोधात सुरू केलेल्या लष्करी कारवाईनंतर गाझामधील पाणी आणि स्वच्छतेशी संबंधित शेकडो पायाभूत सुविधांचं नुकसान झालं आहे किंवा त्या उद्ध्वस्त झाल्या आहेत. बीबीसी व्हेरिफायनं केलेल्या सॅटेलाईट विश्लेषणात ही बाब समोर आली आहे.

एका दुरुस्ती पुरवठा डेपोचंही प्रचंड नुकसान झाल्यामुळं दुरुस्तीच्या कामांवरही गंभीर परिणाम झाल्याचं पाहायला मिळालं आहे.

स्वच्छ पाण्याचा तुटवडा आणि सीवेज किंवा सांडपाणी यामुळं आरोग्यविषयक गंभीर संकट निर्माण झालं असल्याचं मदत करणाऱ्या संस्थांचं मत आहे.

युद्धाच्या नियमानुसार, लष्करी कारवायांसाठी वापर होत असल्याचे पुरावे मिळाले नसतील तर, अशा महत्त्वाच्या सुविधा किंवा ठिकाणं याचं संरक्षण करणं हे इस्रायलचं कर्तव्य आहे. पण तसं असतानाही अशा प्रकारचा विनाश सुरू आहे.

गाझामध्ये कायम स्वच्छ पाण्याचं दुर्भिक्ष्य पाहायला मिळालं आहे. त्यामुळं हा भाग पाण्यासाठी प्रामुख्यानं बोअरहोल आणि डिसॅलिनेशन (विक्षारण) प्रकल्पांवर अवलंबून आहे.

पण पाण्यासाठीच्या पायाभूत सुविधांपैकी अध्यांपेक्षा अधिक ठिकाणांचं गाझानं हमासवर सुरू केलेल्या प्रत्युत्तराच्या कारवाईत नुकसान झालं आहे.

त्याचबरोबर सहापैकी चार सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांचंही नुकसान झाल्याचं आढळून आलं आहे. त्यामुळं घाणीमुळं आरोग्याचा मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता आहेत. तर उर्वरित दोन प्रकल्पही इंधन आणि इतर गोष्टींचा पुरवठा नसल्यानं बंद असल्याचं मदत करणाऱ्या संस्थेनं सांगितलं आहे.

गाझाच्या दक्षिणेला असलेल्या खान युनूस शहरातही दोन नुकसानग्रस्त पाण्याच्या टाक्या सॅटेलाइट इमेजमध्ये दिसून आल्या.

पाणी आणि स्वच्छतेच्या या सुविधांच्या नुकसानीमुळं आरोग्यासंबंधी गंभीर समस्या निर्माण होण्याची शक्यता असल्याचं मत, युकेच्या मेडिसिन्स सॅन्स फ्रँटियर्स या संस्थेचे कार्यकारी संचालिका डॉ. नटालिया रॉबर्ट्स यांनी व्यक्त केलं.

अतिसारासंबधित आजारांच्या प्रमाणात अचानक वाढ झाली आहे,असं त्या म्हणाल्या.

अशा आजारांमुळं गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास लहान मुलं आणि वृद्ध किंवा आजारी असलेल्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. प्रामुख्यानं गर्भवती महिलांसाठी धोकादायक असलेल्या हेपॅटायटिस --चं प्रमाणही या दूषित पाण्यात जास्त आढळून आलं असल्याचं या संस्थेनं सांगितलं.

गाझातील अनेक लोक आश्रयासाठी रफामध्ये गेले आहेत. त्याठिकाणी आजारांमध्ये वाढ होत आहे. त्या ठिकाणीही कोलेराचा धोका वाढला आहे, असं त्यांनी म्हटलं.